खिडकी

सुवर्णा लेले

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

खिडकी

सुवर्णा लेले

खिडकी

लेखक: सुवर्णा लेले

संपर्क क्रमांक: +९१ (९९२०१२६७६३)

ई मेल: lele.suvarna@gmail.com

युनायटेड किंगडम

मुखपृष्ठ- सुवर्णा लेले

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

खिडकी

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : १४ जानेवारी २०२६ (मकर संक्रांती)

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत

नमस्कार,

मी सुवर्णा लेले.

''गंध'' हे माझे पहिले ईबुक होते. त्यातील लघुकथानां चांगला प्रतिसाथ दिल्याबद्दल तुमच्या सर्वांचे आभार!

''खिडकी'' माझे हे दुसरे ईबुक आहे परत एकदा काही लघुकथा लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्या कथा संग्रहातल्या सगळ्या गोष्टी मी आधी ऑडिओ फाइल्स मध्ये रेकॉर्ड केलेल्या आहेत. मग त्या वर्ड फाईल मध्ये कन्व्हर्ट केल्या आहेत. त्यामुळे या गोष्टी काही फार मोठ्या नाहीयेत. रेकॉर्डिंग करत असल्यामुळे मला कमी वेळात जेवढं सुचतं ते मी रेकॉर्ड करते, म्हणून कदाचित गोष्टी लहान आहेत.

मला चित्रपट, नाटके बघायला, गाणी ऐकायला ही आवडतात, लोकांना भेटून गप्पा मारणे हा देखील माझा छंद आहे.

टीम ई साहित्यचे मनापासून धन्यवाद. तुमच्या मुळे पुन्हा एकदा माझ्या सारख्या नवीन लेखन करणारांना खूप छान व्यासपीठ मिळून दिले आहेत.

संपर्क क्रमांक: +९१ (९९२०१२६७६३)

ई मेल: lele.suvarna@gmail.com

युनायटेड किंगडम



गंध

फक्त एक क्लिक

कव्हरवर

आणि

पुस्तक वाचायला तयार.

अर्पणपत्रिका

माझे हे पुस्तक मी माझ्या आजी आजोबांना
समर्पित करत आहे !!!

कथानुक्रम

१. अनोखा निर्णय

२. ऋण

३. अहंकार

४. मिठी

५. स्वर्गातले हळदी कुंकू

६. तुपाची धार

७. दोन शब्द

८. खिडकी

या संग्रहातील सर्व कथा ,सर्व पात्रे, प्रसांग आणि स्थळे पूर्णपणे काल्पनिक आहेत कोणाही व्यक्तीशी वास्तविक घटनेशी साम्य आढळले तर तो निव्वळ योगायोग समजावा.

अनोखा निर्णय

माझ्या केबिनमध्ये दातेने तो बुके टेबलावर ठेवला आणि माझ्या हृदयाचा ठोका चुकला. 'सर, अभिनंदन! अगदी मनापासून खरंच कार्यक्रम किती छान झाला. सीएम साहेबांनी किती कौतुक केलं तुमचं. खरंच अभिमान वाटतो सर की मी तुमचा सेक्रेटरी आहे. थँक्यू! थँक्यू! दाते.'

'बरं सर, या आलेल्या फुलांचं आणि या बुकेचं काय करू? एक काम करा, काही फुलं तुम्ही घेऊन जा. काही स्टाफमध्ये वाटा. पण सर ह्या एका स्पेशल बुकेचं काय करू?'

'स्पेशल बुके? हो, कोणाचा?'

'सर, मिथिला मॅडमचा.'

'मिथिलाचा... तो असू दे.'

'ओके सर.' असं म्हणून दाते खोलीच्या बाहेर निघून जातात.

मी खुर्चीतून उठलो आणि त्या बुकेजवळ गेलो. खरंच किती सुंदर फुलं होती त्यातली. अगदी मला जी आवडतात तीच. आणि एक सुंदर कार्ड. कार्ड हातात घेतलं आणि ओपन केलं.

त्यात लिहिलं होतं:

डिअर, संजय.

कदाचित तू विसरला आहेस. पण मी नाही विसरले.

आज आपल्या लग्नाचा वाढदिवस आहे. लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा संज्या.

तुझीच आणि फक्त तुझीच, मिथू उर्फ मिथिला.

आज आपल्या लग्नाचा वाढदिवस आहे. पार विसरून गेलो होतो मी. आणि कसं लक्षात राहणार? लक्षात राहिली ती व्यक्ती माझ्या जवळ, माझ्या आयुष्यात होती का आता?

बुके हातात घेऊन मी तसाच गाडीत बसलो. सरळ घरी आलो. घरी आल्यावर मी मावशींना म्हटलं, 'मावशी, मी पटकन फ्रेश होतो. चहा ठेवता का?'

'साहेब, मा तुमची वाट पाहात आहेत.'

'बरं, मी येतोच पटकन.'

पटकन फ्रेश झालो आणि खाली आलो.

'मा! अगं, तुझी चहाची वेळ होऊन गेली होती ना? मग का थांबलीस माझ्यासाठी?'

'एक दिवस चालतं रे.'

'संजय, मनापासून अभिनंदन बाळा. टीव्हीवर सगळा कार्यक्रम बघितला. खूप अभिमान वाटला तुझा.'

तेवढ्यात मावशी आत येतात, 'साहेब, ही फुलं कुठे ठेऊ?'

मा लगेच वळून बघते आणि म्हणते, 'ही फुलं... ही फुलं नक्कीच मिथिलाने पाठवली असतील. हो ना?'

'हो, पण तुला कसं समजलं?'

'ही फुलं फक्त तीच पाठवू शकते. संजय, If I am not wrong, आज तुमच्या लग्नाचा वाढदिवस आहे?'

'अरे, माझ्या सकाळीच लक्षात आलं होतं. मुलांच्याही लक्षात होतं. पण आम्ही कोणीच मुद्दाम विषय काढला नाही.'

'हो येस, यु आर राईट मा. मी तर पार विसरून गेलो होतो ग. पण मिथिला, तिच्या अजून लक्षात होते.'

'संजय, तुला या गोष्टीचं इतकं आश्चर्य वाटतंय? अरे असणारच. १५ वर्ष तुम्ही एकत्र होतात. फार मोठा काळ आहे रे हा. पण तू असा जगावेगळा निर्णय घेतलास. मी काय बोलणार, त्यावेळी पण काही बोलले नाही. आणि आता...' असं म्हणून मा आत निघून गेली.

माच्या अशा नाराज होण्याने मला जास्त त्रास व्हायचा. 'खरंच, मी इतका विचित्र निर्णय घेतला होता का?

दादा आणि तू किती वेगळ्या स्वभावाचे होतात. चार लोकांपेक्षा तुमचे स्वभाव किती वेगळे होते. दादा गेल्यानंतर मा नेच मला वाढवलं होतं. मा चा विचार, स्वभाव खूप आधुनिक होता. त्यामुळे आमच्या घरातील वातावरण खूप मोकळं. कधीच कोणी कोणावर कुठलीच बंधनं लादली नव्हती. ह्याच वातावरणामुळे मी कदाचित हा निर्णय घेऊ शकलो होतो.

'मा, तू तरी समजून घे ग मला.' असं म्हणून मी त्या बुकेजवळ आलो. खरंच किती सुंदर फुलं होती ती. अगदी मनापासून एकेक फूल निवडलं होतं. जणू आपला जीवच त्याच्यात ओतला होता.

त्या फुलांकडे बघत मी एकदम भूतकाळात गेलो. युपीएससीची एक्झाम पास झालो आणि आयएएस साठी सिलेक्शन झालो. घरी सगळे खूष होते. लग्नासाठी मा मागेच लागली होती. 'तू कोणी शोधली आहेस का? आम्ही शोधू? खरं सांग!'

'मा, तू पण ना. तुला जे योग्य वाटेल ते कर.'

कोणीतरी मला मिथिलाचे स्थळ सुचवले होते. मा ने आमची दोघांची भेट घालून दिली. मी तिला नकारण्यासारखं काही नव्हतंच. चांगली शिकलेली, चांगल्या घरातली, मॉडर्न विचारांची. आयुष्यात काहीतरी करायची जिद्द असलेली, दिसायला अगदी सर्वसामान्य पण विलक्षण बोलक्या डोळ्यांची अशी मिथिला मला आवडली होती.

मग काय झालं लग्न आमचं आणि अगदी दृष्ट लागण्यासारखा संसार चालू होता. दोघांचे चार कधी झाले हे पण कळलं नाही. मा आणि मिथिला यांच्यातलं नातं काहीतरी वेगळंच होतं. अगदी खेळीमेळीचं. घरात खूप मोकळं वातावरण असल्यामुळे आमच्यात मैत्रीचं नातं जास्त होतं. विश्वास होता एकमेकांवर, घट्ट एकदमच. त्यामुळे आम्ही दोघांनी कधी आपापली मतं कोणावर कधी लादली नाहीत. त्यामुळे या गोष्टीचा कधी कोणी गैरफायदा घेतलाच नाही, अगदी मुलांनी पण.

मिथिला एका इंटरनॅशनल कंपनीमध्ये एक सक्सेसफुल सिविल इंजिनियर होती आणि मी माझ्या जॉबमध्ये बिझी होतो. मुलं त्यांच्या आयुष्यात बिझी होते. एकूण काय, सगळं छान चालू होतं, असा माझा गोड गैरसमज होता. आणि एक दिवशी हा गैरसमज दूर झाला.

एकदिवशी दाते आत आले. मला म्हणाले, 'सर, दोन तीन वेळा मिस्टर नरेन आहुजा यांचा फोन येऊन गेला. तुमच्या मीटिंग चालू होत्या त्यावेळी. मी त्यांना सांगितलं, बिझी आहात. त्यांना तुमच्याशी काहीतरी बोलायचं आहे, भेटायचं असं म्हणत होते.'

'नरेनचा फोन आला होता? बरं, त्यांना सांगा की उद्या भेटू. उद्या लंचमधे इथेच बोलवा.'

मला काही कळत नव्हतं. नरेनने मला का फोन केला होता? नरेन म्हणजे मिथिलाचा बॉस. तो बॉस कमी आणि आमचा फॅमिली मेंबर जास्त होता. एकदम हेल्पिंग, स्वभावाने तर खूपच चांगला होता. पण नरेनला काय प्रॉब्लेम आला असेल? मिथिला तर मला तसं काही बोलली नाही.

असो, उद्या नरेन भेटेल तेव्हा बोलू आणि कळेलच त्याच्या डोक्यात काय आहे ते.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी नरेन लंच ब्रेकमध्ये आला.

'हॅल्लो नरेन. खूप दिवसांनी.'

'अरे संजय, सॉरी, मला माहितीये तू सुपर बिझी आहेस.'

'अरे नाही नाही, तुझ्यासाठी काय बिझी,बरेच दिवसांनी, रादर खूप महिन्यांनी भेटतोय आपण.'

'हो रे. सध्या खूप काम चालू आहे. मिथिला तुला बोललीच असेल.'

'हो, मिथिला पण सध्या खूप बिझी असते. संजय, एक विचारू का?'

'अरे मिथिलाने कामाचा खूप स्ट्रेस घेतलाय का? तुमच्या दोघांमध्ये काही ना काही वाद-विवाद, घरी काही गडबड चालू आहे का? मुलांचं काही टेन्शन आहे का? कारण? अरे नसेल तर चांगलंच आहे. हे बघ, तू माझा एक चांगला मित्र आहेस म्हणून मला तुझ्याशी शेअर करावसं वाटलं. मी मिथिलाला डायरेक्ट विचारलं असतं तर तिचा गैरसमज झाला असता आणि आमच्यात उगीच वाद-विवाद झाले असते.'

'नरेन, काय झालंय?'

'संजय, खूप दिवसांपासून ऑफिसमध्ये खूप लोकांनी नोटीस केलंय आणि मी पण एक-दोनदा नोटीस केलंय. मिथिलाचं आजकाल कामात लक्ष नाहीये. खूपदा असं झालंय की अगदी महत्वाच्या कॉन्फरन्स चालू आहेत. तिच्या मोबाईलवरती कुणाचा तरी अचानक मेसेज येतो. कॉन्फरन्स सोडून ती चक्क मोबाईल घेऊन बाहेर जाते. खूप अनकम्फर्टेबल असते. अरे, काही वेळेस गरज नसताना उगीचच चिडचिड पण करते ती. बऱ्याच वेळा लंचमध्ये ती नसतेच. डेस्कवर फोनमध्येच बिजी असते. सगळ्यांमध्ये असूनही सगळ्यांमध्ये नसल्यासारखीच असते. अशाने तिच्या करिअरवर तर फरक होतोच रे, पण आजूबाजूच्या लोकांमध्ये पण गैरसमज होत आहेत.'

'नकळत खूप लोकं दुखावली पण जात आहेत. म्हणून तुला भेटून विचारूया म्हंटलं. म्हणून तुला म्हणतोय, काही प्रॉब्लेम्स आहेत का?'

'नाही रे. अजिबातच नाही. मला तर काही आयडिया नव्हती ह्या सगळ्या गोष्टींची. हे असं सगळं चाललंय मला माहितीच नाही. मिथिला तर घरी एकदम नॉर्मल असते. पण एनीवेज, थँक यू. तू सगळं शेअर केलंस. मी बोलेन तिच्याशी. म्हणजे डायरेक्ट नाही. पण हळू हळू काहीतरी विषय काढून बघतो तिला कसला प्रॉब्लेम आहे ते. तुझ्यामुळे मला कळलं तरी की ती कसल्यातरी प्रॉब्लेममधून जातेय.'

'अरे, चालेल काहीच हरकत नाही. प्लिज, फक्त तू तिला सांगू नकोस की आपण भेटलो होतो. उगीच तिला माझ्याबद्दल गैरसमज होईल.'

'अरे काळजी करू नकोस नरेन. थँक्स फॉर युवर टाईम संजय. माझ्या जरा मिटिंग्ज आहेत त्यामुळे मला निघायला लागेल.'

'अरे, काहीच प्रॉब्लेम नाही. बाय. थँक्स.' असे म्हणून नरेन पण निघून गेला.

मीटिंग आटपून मी लवकर घरी गेलो. डोक्यात एकच विचार होता. काय झालं असेल? मिथिला असं का वागतेय? काही खरंच प्रॉब्लेम असेल का तिला? काही बोलली पण नाही.

घरी आलो आणि शांतपणे कॉफी पीत बसलो होतो. इतक्यात मिथिला घरी आली. मला वाटलं, मला पाहून ती म्हणेल, 'अरे व्वा! आज एकदम लवकर?' तर उलटंच झालं.

मिथिला म्हणाली, 'अरे, तू आलास! पण आज मला खरंच उशीर झालेला दिसतोय. खूपच उशीर झालाय. सॉरी, सॉरी. बरं, तू कॉफी घेणार का?'

हे सगळं बघून जरा शॉकच झालो. मी तिला म्हंटलं, 'मिथिला, अगं सॉरी काय? चारच वाजलेत, आणि मी ऑलरेडी कॉफी घेतोय.'

'अरे, हो. मी बघितलंच नाही. । think मला थोड्या रेस्टची गरज आहे. मी जरा जाऊन पडते.' असं म्हणून मिथिला सरळ निघून गेली.

मिथिला जरी काही बोलली नसली तरी तिचे बोलके डोळे मात्र सगळं बोलून गेले होते. खरंच तिच्या आयुष्यात काहीतरी घडतंय, हे नक्की.

इतक्यात बाहेरून मा आली. मला बघून एकदम म्हणाली, 'अरे, आज तू लवकर! आणि मिथिला पण आलेली दिसतेय. गाडी दिसली तिची बाहेर. सॉरी बरं, मी उगीच लवकर आले. तुम्हाला डिस्टर्ब केलं का मी? तुमचा एकांत.'

'मा, तू पण. काही डिस्टर्ब केलं नाहीस. मीच जरा लवकर आलो.'

'अरे, मग आज लवकर आलायस ना, तर मस्त मिथिलाला घेऊन कुठेतरी डिनरला जा.'

'अगं, नको नको. आज नको. आज मिथिला जरा दमली आहे. वरती पडलीय ती.'

'हो का? अरे, सकाळी तर व्यवस्थित होती. थकली असेल. बरं संजय, खूप दिवसांपासून विचारायचं म्हणतोय. तुझ्यात आणि मिथिलात सगळं ओके ना?'

'कारण आजकाल मिथिला थोडीशी डिस्टर्ब वाटतेय.'

'अगं, तू मला विचारतेस, आणि मी विचार करत होतो की तुला विचारूया की मिथिला बरी आहे ना?'

घडलेला सगळा प्रकार मा ला सांगितला. मा ला पण थोडं आश्चर्य वाटलं आणि म्हणाली, 'संजय, नक्कीच लवकरात लवकर मिथिलाशी बोल. हो गं. डोन्ट वरी. आजच बोलतो मी तिच्याशी.'

असं म्हणून मी सरळ रूममध्ये गेलो. रूममध्ये बघतो तर काय? मिथिला मोबाईलवर काहीतरी टाईप करत होती. मला बघताच मोबाईल एकदम ठेवून दिला. म्हणाली, 'अरे, आरामच करत होते.'

'अगं असू देत ना, मी कुठे काय म्हटलं तुला. तू कर तुझं काम. जनरल विचारत होतो. लवकर आलोय, तर आपण थोडं फिरायला जायचं? बाहेर जरा मोकळ्या हवेत. किती दिवस झाले मी पण समुद्रकिनारी गेलो नाही. थोडं बरं वाटेल. जायचं का?'

'चालेल. जाऊयात ना? मी तयार होते.'

'काही तयार वगैरे होऊ नकोस. अशीच छान दिसतेस. असंच जाऊया. एक अर्ध्या तासात निघूया.'

'चालेल. मा आणि मुलांना पण घेऊन जाऊया का?'

'नाही नको. त्यांना त्यांचं करू दे काहीतरी. आज आपण दोघेच जाऊया. आज एकदम दोघंच.'

'हो. कधीतरी जाऊयात ना? तुला काही प्रॉब्लेम नाही ना?'

'नाही. काही प्रॉब्लेम नाही. जाऊयात.'

ठरल्याप्रमाणे आम्ही दोघेही बाहेर आलो. आणि चालता चालता मी विचारच करत होतो की आता या विषयाला कशी सुरुवात करूयात?

इतक्यात मिथिलाच मला म्हणाली, 'मला काहीतरी तुला सांगायचं होतं खूप दिवसांपासून, पण कसं सांगू हेच कळत नव्हतं.'

'अगं हो, ते माझ्या लक्षात आलंय खरं. मला पण तुला काही गोष्टी विचारायच्या होत्या. काय झालंय? तुझ्यात सध्या खूप बदल झाल्याचे जाणवतंय. तू बरी आहेस ना? काही प्रॉब्लेम आहेत का? सांग. आज मनसोक्त गप्पा मार. मोकळी हो. माझ्यासमोर जे बोलायचे ते सहज रित्या बोल.'

'हो, नक्कीच बोलेन मी. पण मला भीती वाटतेय. तू माझा तिरस्कार तर नाही करणार ना? किंवा तू याचा काही वेगळाच अर्थ नाही ना घेणार?'

'मिथिला, तिरस्कार करण्या इतपत एवढं काही झालंय का?'

'नाही रे, तसं मला वाटत नाहीये. पण तरी मला तुझ्या मदतीची गरज आहे. कदाचित मार्गदर्शनाची, असंही म्हणता येईल. काही दिवसांपासून... किंवा महिन्यांपासून माझ्या डोक्यात एक वेगळंच वादळ चालू आहे. त्या वादळाला आता शांत करायची वेळ आलीये. कळतच नाहीये काय होतंय आयुष्यात? आणि आपण काय करतोय?'

ती क्षणभर थांबली. तिचे शब्द माझ्यावर एकामागून एक वार करत होते.

'मी स्टेलामध्ये भावनिकरित्या खूप गुंतल्या गेले आहे.'

बुकेतील फुलं आणि समुद्रावरून येणारा वारा... मला काहीच जाणवत नव्हता. माझ्या डोक्यात एकच प्रश्न घुमत होता: 'ती कशाबद्दल बोलतेय?'

'होल्ड ऑन मिथिला! तू काय बोलत आहेस, याचा अर्थ तुला कळतोय का?' मी एकदम ओरडल्यासारखं केलं. 'तू 'इमोशनली इन्व्हॉल्व्ह' झाली आहेस? एका स्त्रीमध्ये?'

तिच्या चेहऱ्यावर भीती नव्हती, पण एक प्रकारचा वेदनादायक निश्चय होता.

'मी कुठे कमी पडलो? आपल्या एवढ्या वर्षांच्या संसारात, मी काय ग कमी केलं? मी तुला वेळ दिला नाही म्हणून तू एका भावनिक आधाराच्या शोधात गेलीस? आणि तो आधार एका पुरुषाऐवजी...' माझा आवाज अडकला.

मी क्षणभर थांबलो. डोळे मिटून घेतले. माझ्या मनात, माझ्या संस्कारात, माझ्या पुरुषी अस्तित्वाला प्रचंड मोठा धक्का बसला होता. हे स्वीकारणे माझ्यासाठी अशक्य होते.

'मिथिला, हे फक्त 'इमोशनल इन्व्हेस्टमेंट' नाहीये. तू तुझ्या आयुष्यातून मला काढून दुसऱ्या व्यक्तीला, तिला, इतकी जागा दिलीस? मला खरं सांग. हे प्रेम आहे का? फिजिकल अट्रॅक्शन नसेलही, पण हे फक्त निखळ मैत्री नाही. हे प्रेम आहे! मान्य कर.'

'संजय, तू काय बोलतोयस? मी तुला एकदा तरी असं काही म्हटलंय का? प्रेम वगैरे काय? अरे, फिजिकल अट्रॅक्शन पण नाही. अरे नुसती भावनिक इन्व्हेस्टमेंट आहे. एक निखळ मैत्री असू शकते ना?'

'याला जबाबदार तूच आहेस. सगळा दोष तुझाच आहे. तू आजकाल इतका बिझी असतोस. या चार महिन्यांत स्टेलाने माझीच माझ्याशी नव्याने ओळख करून दिली आणि हीच गोष्ट मला आवडली तिची.'

'किती सहजपणे तिने मला समजून घेतलं. माझ्यात पण काहीतरी वेगळं टॅलेंट आहे हे तिने मला जाणवून दिले. यामुळे माझा कॉन्फिडन्सही वाढला. मी आयुष्यात काहीतरी करू शकते याची जाणीव पण झाली. इतकी वर्ष एकत्र राहून काही गोष्टी तुला माझ्यातल्या कधीच कळल्या नाहीत, ज्या तिला सहज रित्या कळल्या. आणि हेच मला आवडलं.'

'तू मला वेळ दिलास, पैसे दिले, मोकळीक दिली. पण मैत्री नाही दिली. तू माझ्या स्वप्नांकडे नेहमी एका आयएएस अधिकाऱ्याच्या 'पत्नीच्या छंदा'सारखं पाहिलंस. स्टेलाने ते 'छंद' नाही, तर माझं अस्तित्व म्हणून स्वीकारलं. तू बिझी होतास, पण मी एकाकी होते.

'मला तिची इतकी सवय झालीय ना, की मी कुठलाही निर्णय घेताना, कुठलीही गोष्ट करताना सतत तिचाच विचार करते. म्हणूनच मला भीती वाटतेय की मी आयुष्यात पुढे काही करूच शकणार नाही का? जर मला स्टेलाची साथ नसेल तर, असं उपयोगाचं नाही ना रे? मला याच्यासाठी तुझ्याशी बोलायचं होतं आणि तुझं मत जाणून घ्यायचं आहे की मी काय करू? ह्या चक्रव्यूहातून कशी बाहेर येऊ?'

'काही नाही, सोप्पंय. तिच्याशी कॉन्टॅक्ट तोडून टाक. म्हणजे हे प्रश्नच उद्भवणार नाहीत.'

'वा! वा! इतकं सोप्पं असतं ना, तर ते केव्हाच केलं असतं रे. पण ते आता शक्य नाहीये.'

'बरं बस, आता हा विषय. मी सांगतो तुला काहीतरी उपाय यावर. पण आता घरी जाऊया. खूप उशीर झालाय.'

'हो, जाऊया लगेच आपण घरी.'

घरी आल्यावर मी सगळा प्रकार माच्या कानावर घातला. माची ह्याच्यावर काही रिएक्शन नव्हती. उलट मा म्हणाली, 'आपण मिथिलाला समजून घ्यायला पाहिजे. तिला वेगळ्या दृष्टीने बघण्यात

पॉईंट नाही. आपण नाही, रादर तू तिला जास्त समजून घ्यायला पाहिजेस. आणि मला खात्री आहे तू नक्कीच तिला समजून घेशील.'

'हो, आय विल ट्राय मा.'

जरी माझ्यावर माचे संस्कार असले तरी मा सारखं मोठं मन नव्हतं माझं. शेवटी मी एक पुरुषच होतो.

मी शिकलेला, आधुनिक विचारांच्या घरात वाढलेला असूनही, माझ्या मनात एक भिंत उभी राहिली होती. ही भिंत प्रेमाची नव्हती; ती केवळ पुरुषाच्या 'मालकीच्या' अधिकाराची होती. 'एक स्त्री दुसऱ्या स्त्रीसाठी...?' हा विचार माझ्या 'पुरुषी' अस्तित्वाला नख लावत होता. मला वाटलं, ती मला फसवू शकत होती, पण एका पुरुषासाठी, एका स्त्रीसाठी नाही. हा माझा पराभव होता.

असेच बरेच दिवस गेले. आमच्यातील मैत्री नाही, पण संवाद पूर्णपणे तुटला. या दरम्यान, मिथिला आणि स्टेलाची मैत्री मात्र तसूभरही कमी झाली नव्हती.

एक दिवस, त्या रागाच्या भरात... मी सर्वस्व गमावण्याचा निर्णय घेतला.

'मिथिला,' मी शांतपणे, पण अतिशय टोकदारपणे बोललो. 'मला वाटतं... तुझ्या प्रॉब्लेमवर माझ्याकडे एक सोल्युशन आहे. तू स्टेलाकडे जा—कायमची.'

तिचा चेहेरा पांढराफटक पडला.

'आपण आता एकत्र नको राहायला. तसंही—मी तुला समजू शकलो नाही इतक्या वर्षांत. तर पुढे काय समजणार? माझ्या मते असं निखळ मैत्री वगैरे काही नसतं. हे काहीतरी वेगळंच प्रकरण आहे. तू काहीतरी माझ्यापासून लपवत आहेस. तुला काही गोष्टी सांगायच्या नाहीयेत असं मला वाटतं. आणि यावर बेस्ट सोल्युशन हेच आहे.'

म्हणजे ज्या गोष्टीची मला भीती वाटत होती, अगदी तशीच झाली.

'तू माझा तिरस्कारच करतोयस. तू हा विषय भलतीकडेच नेला आहेस. तुझ्या डोक्यात काहीतरी भलतंच चालू आहे. वाईट वाटतंय. मला वाटले माचे तुझ्यावर संस्कार आहेत, त्यामुळे तुझे विचार वेगळे असतील. आपल्या घरातलं वातावरण हे खूप वेगळं, मोकळं आहे, वेगळा विचार करणारं घर आहे आपलं. पण तू त्यातला नाहीस. जाऊ दे. मला ह्याच्यावर वाद घालायचा नाही.'

'आणि तुझं मत मला कळलंय. आणि इथे राहण्यात काही अर्थ नाही. तुझे असे विचार असतील, तर मी इथे राहून तरी काय करू? बरं, मी जाते आत्ता लगेच. माझ्यासाठी नाही जाणार मी. जाणार आहे तुझ्यासाठी. कारण तू जो हा अनोखा निर्णय घेतला आहेस ना, त्याचा तुला पश्चात्ताप होईल हे नक्की.'

इतक्यात मा येते आणि मिथिला आत जाते. मा माझ्याकडे बघतच राहते. मिथिला बॅग घेऊन बाहेर येते आणि मा ला घट्ट मिठी मारते.

त्या दोघी एकमेकींना घट्ट धरून उभ्या होत्या. मी त्या दोघांकडे पाहत होतो. मा ने माझ्याकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांमध्ये माझ्यासाठी राग नव्हता, पण अतीव निराशा होती. ती काहीच बोलली नाही. तिचं मौन माझ्या शब्दांपेक्षा जास्त बोचणारं होतं. मी, तिचा मुलगा असूनही, तिच्या आधुनिक विचारांच्या चौकटीत बसू शकलो नाही, हे त्या एका नजरेने मला जाणवलं. मिथिला बॅग उचलते आणि दार बंद करून निघून जाते.

ऋण

“वहिनी! शांता वहिनी! मालकांनी तुम्हाला तातडीने गोठ्यावर बोलावले आहे. गोदा अडली आहे, जीव कासावीस होतोय, तिची सुटका होत नाहीये," नोकराने धापा टाकत येऊन निरोप दिला.

वहिनी (शांता) कपाळावर हात मारून म्हणाली, "अरे देवा! दिवस संपायला आला, रात्र उतरू लागली, तरी अजून गोदाची सुटका नाही झाली. देवा रे देवा!"

तिने घराच्या आत डोकावले आणि हळूच म्हणाली, "नाम्या! अरे, इथे या म्हातारीला पण नाही बरं वाटत. आता हिला असं सोडून कसं येऊ?" मुलांकडे वळून म्हणाली, "पोरांनो, मी जरा जाऊन येते. गोदी अडली आहे. बघते जरा काय चाललंय ते."

"आई, तू काही काळजी करू नकोस. आम्ही बघतो आजीकडे," मुले एकमुखाने म्हणाली. "तू आपल्या गोदाकडे बघ. गरज लागली तर सांग, आम्ही पण येतो मदतीला."

"व्हय व्हय पोरांनो. बघते मी," असे म्हणून शांता काळजीत पाय उचलत निघाली.

"आज्जे, तू अंधारात का बसलीस? इतकी शांतता भयाण वाटते. दिवा लावू का?"

"आज्जे, तुला काही त्रास होतोय का? थोडं पाणी घे," मुलांनी विचारले.

आजीचा आवाज एका दूरच्या किनाऱ्यावरून येत असल्यासारखा होता. "पोरांनो, मला काही नको. आतड्याला पीळ पडल्यासारखं वाटतंय. अंगात आता फक्त श्वास उरलाय. आता या देहाचा भार पुरे झाला. देवाने आता कधीही आपली दारे उघडावीत."

"अरे शांता कुठे गेली? तुम्ही दोघंच कसे घरात?" आजीने विचारले.

"आज्जे, अगं काय सांगायचं? आपली गोदी कधीची अडकून बसलीये, सुटकाच होत नाहीये म्हणून नानांनी आईला मदतीला बोलावले."

बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता. पाण्याचा आवाज गोठ्यातील वेदना आणि निराशेचा हंबरडा गिळंकृत करत होता.

शांताने पाहिलं. नाना डोक्याला हात लावून उभे होते.

"धनी! गोदा... तिचे डोळे बघा. ती आता वेदनेने गलितगात्र झाली आहे. या अंधारात आणि पाण्यात डॉक्टर आणणे म्हणजे अशक्यच आहे."

शांताने गोदीच्या ओल्या, थंडगार अंगावर हात फिरवला. "गोदा, तुझा प्रत्येक कण कण दुखावत असेल ना ग? मुकी आहेस तू, पण तुझी मूक किंकाळी माझ्या काळजाला भिडतेय."

नाम्याने हळूच नानांना सुचवले, "मालक, म्हातारी... तिचा आणि गोदीचा जीव एक आहे. कदाचित म्हातारीचा तो जिव्हाळ्याचा स्पर्श..."

नाना कावरबावर झाले. "नाही! म्हातारीला या थंडीत आणणं म्हणजे तिचा जीव धोक्यात घालणं. नको, हा निर्णय नको! तू घरी जा नाम्या. मुलांची आणि म्हातारीची काळजी घे."

नाम्याने निरोप दिला. "गोदी अजून मोकळी होत नाही. तुम्ही जेवण करून घ्या. म्हातारीला पण जेवायला घाला."

"आज्जे, थोडं तरी खा. तुझा चेहरा पांढरा पडलाय."

आजीने डोळे उघडले. त्यात एक तीव्र, चमकणारी आस होती. "गोदी... नाही मोकळी झाली? मला नेऊन चला तिकडे!"

"आज्जे! तुझी शक्ती संपलीये आणि बाहेर पाण्याचं तांडव चाललंय! नाना ओरडतील."

आजीचा आवाज थरथरला, पण त्यात एक निश्चितता होती. "नाना काहीबी बोलणार नाय. नानाला माहितेय, कपिला गायीचे आणि तिच्या पोरीचे, गोदाचे, आपल्यावर किती उपकार आहेत. यांच्या दुधावरच आपलं घर चाललं होतं."

आजीचा आवाज भरून आला. "नाना जन्मला, तेव्हा माझी तब्येत इतकी खराब झाली की मला दूध येईना. नानाचे हाल झाले. गावात कुणीतरी म्हणाले, नुकत्याच बाळंत झालेल्या गाईचे दूध द्या. देवाच्या कृपेने कपिला नुकतीच बासेला झाली होती. कितीतरी महिने नाना फक्त कपिलेच्या दुधावर होता. आज माझा नाना जिवंत आहे ना, तो या कपिलामुळे! लई उपकार आहेत ग बाई तिचे माझ्या पोरांवर. आज

वेळ आली आहे, हे ऋण फेडायची. चला मला घेऊन! मला घेऊन चला! मला माझ्या लेकीला बघायचे आहे!"

अगं म्हातारे! कसं शक्य आहे ते? बाहेर वादळी पाऊस पडतोय?"

"राहू दे पाऊस! काय होईल ते होईल! मी काय या पावसाला घाबरत नाय. चल, तू आधी सायकल काढ. मी बसते तुझ्या मागे. घेऊन जा बघू मला!"

"नाना! अरे गोदा कुठे?" आजीचा श्वास लागला होता, पण तिच्या डोळ्यात फक्त गोदी होती.

नाना धक्क्याने ओरडले. "म्हातारे! काय केलेस हे! तुला इथे आणले कोणी!"

"थांब नाना! "उगाच बोलू नकोस पोरांना! आज त्यांच्यामुळे मी इकडे आले. मला दाखव बघू गोदी कुठे?"

आजीने गोदीला पाहिलं. गोदीने एक शेवटचा, हृदय पिळवटून टाकणारा हंबरडा फोडला. तिच्या डोळ्यांत आजीसाठी जणू विनवणी होती.

"बाळा, बास कर. किती त्रास सहन करतेस? आली बघ तुझी म्हातारी."

आजीचे हात थरथरत नव्हते; ते आता स्थिर झाले होते. जणू त्या स्पर्शासाठीच ती थांबली होती. त्या थरथरणार्या हातांनी तिने गोदीच्या मानेवरून आणि कपाळावरून ममतेचा स्पर्श दिला.

तो स्पर्श ममतेची आणि मुक्तीची संवेदना घेऊन आला. गोदीचे शरीर शांत झाले. तिच्या वेदनेचा कपाटासारखा ताण गळून पडला.

नानांनी आजीला घरी पाठवले. "आता जे व्हायचे ते होईल, पण म्हातारीला आराम मिळू दे."

रात्र झाली. अजून गोदाची काही खबरबात आली नाही. पाऊसही थांबला नव्हता.

घरी अंथरूणावर पडलेल्या आजीचे डोळे मात्र मिटलेलेच राहिले. त्यांचा चेहरा शांत, पण थकलेला दिसत होता.

"म्हातारे! एक वेळ डोळे तरी उघडू ग बाई. काय झालं? डोळे उघडलेस का?" शांता हळूच बोलली. "काळजी करू नकोस. उद्या डॉक्टरांना बोलवू."

शांताला वाटले की म्हातारी झोपेत आहे.

तेवढ्यात एक नोकर धावत, अत्यंत आनंदात आला.

"वहिनी! वहिनी! गोदाची सुटका झाली! मालकांनी निरोप पाठवलाय - म्हातारी जशी घरी गेली आणि गोदाची सुटका झाली! एकदम गोड वासरू झालं आहे!"

शांता आनंदाने म्हणाली, "आहो, म्हातारीला सांगा बरं हे! आता हे म्हातारी डोळे उघडले की..."

"आज्जे! हे आज्जे! डोळे उघड! अगं बघ नाना पण आलेत! आई! आई! डोळे उघड! झाली बाई सुटका झाली हो गोदाची!"

नानांनी धावत येऊन आजीचा हात हातात घेतला. तो थंडगार पडला होता.

"अरे देवा!" नाना किंचाळले. "म्हातारीने प्राण सोडले की काय?"

शांताने डोळे पुसले. "हो नाना. पण जाता जाता आपले ऋण फेडले. एका जीवाने दुसऱ्या जीवासाठी दिलेला तो अंतिम त्याग होता."

अहंकार

आज हे असं काय होतंय मला? मी माझाच रागराग करतोय? विचार करून करून मेंदू पार बधीर झालाय. मेंदूला जणू मुंग्या आल्यात. मी गौरीशी बोलू का? होय. मला आज बोलायलाच हवंय गौरीशी. विचारांच्या या चक्रव्यूहात मी पार बुडून गेलोय. असं म्हणून समीर सिगरेटचे दुसरं पाकीट उघडतो. इतक्यात गौरी आत येते.

"समीर, समीर, तू इकडे आहेस? अरे मी अख्ख्या घरभर शोधत होते तुला. येतोयस ना जेवायला? आणि हे रे काय? सिगरेटचं दुसरं पाकीट. तू बरा आहेस ना?"

"हो तू हो पुढे, मी आलोच."

"बरं, ये हा लवकर. नाहीतर जेवण गार होईल." असं म्हणून गौरी आत निघून येते.

समीर परत विचार करायला लागतो. काय करू? गौरीला सगळं सांगून टाकू का? तिला विचारू का? तुलाही असंच वाटतं का गं? की तुझा समीर अपराधी आहे? आणि ती जर हो म्हणाली तर... समीर आत येतो आणि जेवायला बसतो.

समीरचं जेवणामध्ये लक्षच नसतं. गौरी काहीतरी विचारत आहे याचं त्याला भानही नाहीये. इकडे गौरी एकटीच बोलत असते. "भाजीत मीठ जास्त झाले आहे ना रे आज? पण काय झालंय मावशीला काय माहिती, दोन तीन दिवस बघतेय मी, रोज भाजीत मीठ जास्त होत आहे. बोलायलाच पाहिजे मावशीशी. अरे तब्येतीसाठी जास्त मीठ खाणं चांगलं नाही ना?"

"अरे अरे समीर! मी आत्ता काय सांगत होते? भाजीत मीठ आहे, उलट जास्त आहे आणि तू तरी वरून मीठ घालतोस!"

"हो का? मी मीठ घातलं आत्ता भाजीत?"

"हो! अरे काय झालंय काय? म्हणजे मी एकटीच बडबड करत आहे का? तुझं लक्षच नाहीये माझ्या बोलण्याकडे."

"तू काही बोलत होतीस का?"

"हे रे काय? म्हणजे तुझं लक्षच नाहीये माझ्याकडे. जाऊदे. मला तुझ्याशी काही बोलायचंच नाहीये."

"अगं, हो, सॉरी! नाहीये ग माझं लक्ष. आज अजिबात लक्ष नाहीये. माझं कशातच मन रमत नाहीये."

"हो, ते आलंच माझ्या लक्षात. सिगरेटची दोन पाकिटं उडवली आहेस. कसलं एवढं टेन्शन आलंय? काय झालंय सांगशील का मला?"

"हो सांगतो ना. सकाळी ऑफिसला गेलो आणि रवीचा मेसेज आला."

समीरने खोल श्वास घेतला, जणू काहीतरी जड दगड मनातून काढायचा प्रयत्न करत होता.

"सम्या एक खुशखबर आहे तुझ्यासाठी. मधुरा इज नो मोअर. उद्या अंत्यविधी आहेत तिचे. आम्ही सगळे तुझी वाट बघतोय. आय होप आता तरी तू येशील."

"रवीचा मेसेज वाचून मी परत माझ्या भूतकाळात गेलो. हो, मी तुला काही गोष्टी सांगणार नव्हतो. रादर मला त्याची गरजच वाटत नव्हती. पण नाही, आज ह्या मेसेजमुळे मी इतका डिस्टर्ब झालो आहे

ना की मला तुला काही गोष्टी सांगायच्या आहेत आणि तुला विचारायचं आहे की खरंच मी अपराधी आहे का गं?"

समीर असं काय झालंय एकदम? तू असं का बोलतोयस?" गौरीने काळजीने त्याचा हात धरला.

"सांगतो ना. तुला माहितीये ना मी माझ्या कॉलेजच्या दिवसांमध्ये नाटकांमध्ये काम करायचो आणि माझ्या नाटकाची हिरोईन असायची मधुरा. माझ्या प्रत्येक नाटकाची हिरोईन मधुरा होती. ती रंगमंचावर आली की जणू दिव्याखालील लाईटही तिच्यासाठीच अधिक तेजस्वी होत असे. आमची जोडी एवढी फेमस होती की 'समीर-मधुरा' हे नाव म्हणजे जिंकण्याची गॅरंटीच असायची. एकदा आम्ही स्टेजवर आलो की प्रेक्षकांचा आणि परीक्षकांचा डोळा फक्त आमच्याकडेच असायचा. टाळ्यांचा कडकडाट म्हणजे आमच्यासाठी एक विजयोत्सवच असायचा. मधुराचा स्वभावही अत्यंत मनमिळाऊ होता आणि दिसायलाही ती सुंदर होती. तिच्या बोलण्यात एक सहजता होती, जी कोणालाही आपलीशी वाटे.

नाटकात एकत्र काम करता करता मी मधुराच्या प्रेमात कधी पडलो हे माझं मलाच कळलं नाही. मी रियल लाईफमध्ये पण मधुरा माझी पार्टनर व्हावी याची स्वप्नं बघायला लागलो. अभ्यासात मी हुशार

होतोच, पण दिसण्यामध्ये पण काही कमी नव्हतो. त्यामुळे मला अगदी खात्री होती की मी मधुराला विचारलं की ती हमखास मला हो म्हणेल. मी घरी आई आणि नानांना पण सांगून ठेवलं होतं. माझ्या करियरचे काय प्लॅन आहेत, त्याच्यानंतर लग्नाचं काय प्लॅन असेल, सगळं सगळं माझं प्लॅनिंग झालं होतं. माझ्या ग्रुपमध्ये पण सगळ्यांना माहिती होतं की मला मधुरा आवडते. आयुष्य पण ही स्पर्धा आहे असंच मला वाटत होतं. मी प्रत्येक स्पर्धा जिंकत होतो तशी ही प्रेमाची स्पर्धा पण मी नक्कीच जिंकणार याचा मला फुल्ल कॉन्फिडन्स होता.

मग ठरलं की मधुराला विचारावं आणि ठरल्याप्रमाणे मी मधुराला सगळं सांगून टाकलं. मधुरा फक्त शांतपणे ऐकत होती. तिच्या चेहऱ्यावर काही हावभाव नव्हते.

मला जरा भीती वाटली. मी तिला म्हटलं, 'मधुरा तू काहीच बोलत का नाहीस? तुझं आहे ना माझ्यावर प्रेम?'

यावर मधुरा म्हणाली, 'समीर, तुझा काहीतरी गैरसमज झालाय रे. मी तुला या नजरेतून कधीच बघितलं नाही. बहुदा तू नाटक आणि रियल लाईफ हे एकच आहे असं समजायला लागला आहेस. मी तुझ्याकडे फक्त एक मित्र म्हणून बघते. या पलिकडे काही नाही. सॉरी समीर,

तुझ्या मनात जे आहे ते कधीच होऊ शकणार नाही. हो, पण आपण आयुष्यभर एक चांगले मित्र-मैत्रीण म्हणून नक्कीच राहू शकू.'

माझ्या पायाखालची जमीन सरकली. माझ्या कॉन्फिडन्सचा एका क्षणात चुराडा झाला होता. मी तिला परत विचारले, 'मधुरा! का नाही होणार? हे काय शक्य नाहीये? काय कमी आहे माझ्यात? कॉलेजचा टॉपर आहे. दिसायला सुंदर आहे. अजून काय हवंय?'

'सॉरी समीर. अजून काय हवंय? याचं उत्तर आत्तातरी माझ्याकडे नाहीये. पण हे आत्ता शक्य नाही. माझ्याकडून तरी कधीच शक्य नाही. सॉरी समीर.'

हे ऐकून मला मधुराचा भयंकर राग आला होता. मला कुठलीच गोष्ट मिळाली नाही असं कधी झालंच नव्हतं. रादर मी कधी हरलो नव्हतो. पण आज मात्र मी हरलो होतो आणि ती हार मला पचत नव्हती. याच रागाच्या भरात मी अमेरिकेला गेलो पुढील शिक्षणासाठी. तिकडे गेल्यावर या सगळ्या गोष्टी मी विसरायच्या ठरवल्या.

परत आल्यानंतर आई आणि नानांनी लग्नाचा विषय काढला. मी म्हटलं, 'ओके करूया लग्न.' मग तुझं स्थळ आलं. आपण भेटलो,

बोललो, तू मला आवडलीस. तुझे विचार मला आवडले. पण तुझं नाव मला खटकत होतं... मधुरा."

"ओक्के आत्ता मला लिंक लागतेय! किती भयंकर आहे हे! म्हणून तू माझं नाव बदललं!?" गौरीचा आवाज आता थरथरत होता. तिच्या चेहऱ्यावर संताप आणि दुःख स्पष्ट दिसत होतं. "तू माझ्या अस्तित्वाचं नाव केवळ तुझ्या भूतकाळातील एका पराभवाचं प्रतीक म्हणून बदलून टाकलं? मला या नावाने आपल्या आयुष्याची सुरुवात करायची नव्हती... मला त्या आठवणीही नको होत्या... मला विचारावंसं नाही वाटलं? मी कोण आहे, समीर? मी तुझी पत्नी आहे की तू विसरू इच्छिलेल्या एका जुन्या कथेचं एक नवीन पान?" तिचे डोळे पाण्याने डबडबले.

समीर खाली मान घालून म्हणाला, "सॉरी ग. पण मला या नावाने आपल्या आयुष्याची सुरुवात करायची नव्हती. मला ते नाव नकोच होतं. मला त्या आठवणीही नको होत्या. तुझ्या प्रेमाच्या सहवासात मी ते सगळं विसरून गेलो होतो. पण काही वर्षांपूर्वी जे कॉलेजचं गेट टुगेदर झालं होतं ना तेव्हा मधुरा मला परत भेटली."

"माझा अहंकार दुखावल्यामुळे मी मधुराशी काहीच बोलायला गेलो नाही. पण मधुरा स्वतःहून आली होती बोलायला. मला म्हणाली,

'समीर, अजून मला माफ नाही का केलंस? मी तुला त्यावेळेला नाही म्हटलं ह्याचा इतका राग... आपली मैत्री विसरून गेलास का? किती वर्ष आपण एकत्र स्पेंड केली होती. सगळं विसरलास का रे? निव्वळ मी तुला नाही म्हटलं म्हणून.'

यावर मी काहीच बोललो नाही आणि सरळ बाहेर निघून गेलो. मग काही दिवसांनी मधुराने फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली आणि ती पण मी ॲक्सेप्ट केली नाही. घडलेला सगळा प्रकार रवीला माहिती होता. रवी माझ्यावर चिडला. मला म्हणाला, 'सम्या इतका कसला रे राग? बरं, तुझं काय वाईट झालंय आयुष्यात, की एक मुलगी नाही म्हणाली ह्याचा एवढा राग. एवढी टोकाची भूमिका घ्यावी? अरे मान्य! बोलू नकोस. पण फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट कर ना. त्याच्यात कसला आलाय एवढा अहंकार.' मधुरा मात्र तिच्या परीने जेवढे शक्य होते तेवढे सगळे प्रयत्न करत होती. मी मात्र 'नाही' म्हणजे अजिबातच नाही. पाच वर्ष झाली मी तिची फ्रेंड रिक्वेस्ट अजिबात ऍक्सेप्ट केलीच नाही."

"समीर, काय काय खरं सांगतो आहेस तू? मला विश्वास बसत नाहीये. तू असाही वागू शकतोस आणि तसा वागलास तू? काय बिघडलं असतं जर तू ती फ्रेंड रिक्वेस्ट एक्सेप्ट केली असतीस तर?" गौरीच्या आवाजात स्पष्ट तिरस्कार होता.

"नाही. काही बिघडलं नसतं, पण मी हरलो असतो पुन्हा एकदा आणि ती जिंकली असती. आणि मला हेच होऊ द्यायचं नव्हतं. पण आज रवीचा तो मेसेज वाचल्यापासून माझ्या मनात कसलातरी गिल्ट येतोय. खरंच मी काही अपराध केलाय का? रवीच्या दृष्टीने तर मी अपराधी आहेच. मला तुझं उत्तर ऐकायचं आहे गौरी. बोल ना. अशी शांत नको बसू. काहीतरी सांग. खरंच तुझा समीर तुला अपराधी वाटतोय का?"

गौरी काहीच बोलत नाही. तिच्या डोळ्यात केवळ एक थंड, निःशब्द प्रश्न होता. ती खुर्चीवरून उठते आणि खोलीच्या बाहेर निघून जाते.

ती खोलीतून बाहेर पडल्यावर संपूर्ण घरात एक भयंकर शांतता पसरली. ती शांतता म्हणजे फक्त गौरीचा राग नव्हता, तर ती मधुराच्या अस्तित्वाची आणि तिच्या क्षमेची अखेरची साक्ष होती. समीरने रिकाम्या ताटाकडे पाहिलं. जेवणावर अजूनही मीठ तसंच पसरलेलं होतं, जे त्याने नकळत वाढवलं होतं. जास्त झालेलं मीठ, जणू त्याच्या आयुष्यातील अपराधाची चव! त्याला कळलं, गौरीने त्याला उत्तर दिलं नव्हतं, पण तिचं निघून जाणं हेच उत्तर होतं–हो, तू अपराधी आहेस.

त्याने सिगरेटचे पाकीट पुन्हा उचलले. पण यावेळेस त्याला सिगरेटची गरज वाटली नाही. त्याला गरज होती ती एका अश्रूची, जो इतक्या वर्षांत त्याने गाळला नव्हता. तो पराभव मधुराचा नव्हता, तो पराभव फक्त समीरच्या अहंकाराचा होता. आणि त्या अहंकाराने आज फक्त मधुरालाच नाही, तर गौरीलाही त्याच्यापासून दूर केलं होतं. रवीचा मेसेज वाचल्यापासून त्याला वाटणारा गिल्ट आता एका भयंकर सत्यामध्ये बदलला होता. 'मधुरा इज नो मोअर.' तो हळूच खुर्चीतून उठला आणि हॉलच्या दाराजवळ गेला. त्याला गौरीला आवाज द्यायचा होता, पण त्याला कशासाठी आवाज द्यायचा हेच कळेना. तो स्वतःलाच विचारत राहिला, "मी काय गमावलं? माझं प्रेम की माझा अभिमान?"

मिठी

"काय मग, अजून झोपला नाही का ओमी?" मी खोलीत येताच अनूला दबक्या आवाजात विचारलं. "हो रे, आत्ताच शांत झालाय. पण झोपला नाहीये अजून फक्त डोळे मिटून पडला आहे." अनूच्या आवाजात थकवा आणि काळजी दोन्ही जाणवत होतं. "माझ्यावर खूप चिडला आहे ना गं? संध्याकाळपासून त्याने माझ्याकडे साधं बघितलं पण नाही." माझ्या बोलण्यात अपराधीपणा होता. अनू म्हणाली "तो तरी काय करणार? लहान आहे अजून, काही गोष्टी नाही समजत त्याला डोन्ट वरी उद्या सकाळी नॉर्मल असेल.'' चला, आपण पण झोपूयात. आता या विचाराने झोप खराब करून घेण्यात अर्थ नाही. ऑलरेडी खूप उशीर झालाय." असं म्हणून मी आणि अनू झोपायला गेलो, पण त्या

रात्री मला काही झोप येत नव्हती. माझे सगळे प्रयत्न करूनही, प्रत्येक विचारासरशी, ओमीचे शब्द माझ्या कानात घुमत होते. "बाबा, बाबा प्लीज नको ना रे आपण जायला," तो आवाज अगदी माझ्या छातीवर आदळत होता. "ऐक ना रे बाबा!" कधीतरी त्याला समजावण्याची माझी धडपड आणि त्यातून येणारा माझा निरुपाय... याच विचारात कधी सकाळ झाली, कळलंच नाही. मी पटकन आवरून ब्रेकफास्टसाठी खाली आलो.

रोजच्यासारखा ओमी ब्रेकफास्ट करत होता. मला वाटलं, मला बघून म्हणेल, 'गुड मॉर्निंग बाबा.' पण ओमी आज काही बोलला नाही; तो माझ्याकडे ढुंकूनही न पाहता शांतपणे ब्रेकफास्ट करत बसलेला. त्याचं ते शांत, थंड वागणं माझ्या आत काहीतरी तोडून टाकत होतं. मग मीच त्याला म्हटलं, "ओमी बाळा. बाबाशी बोलला नाहीस का? तुझा बाबा खूप बॅड आहे, मला माहीत आहे. पण या बॅड बाबावर तू एवढा रागावला आहेस?" तो पटकन चमचा खाली ठेवून, नजर न वळवता म्हणाला, "होय! मी खूप चिडलो आहे तुमच्यावर. मला खूप राग आला आहे तुमचा. मला तुमच्याशी अजिबात बोलायचं नाहीये." असं म्हणून तो सरळ उठला आणि माझ्याकडे पाठ फिरवून बाहेर निघून गेला.

हा सगळा प्रकार बघून अनू मला म्हणाली, "अरे देवा! हे काय चाललंय? मला वाटलं आज हा नॉर्मल असेल. याला तर साधा धक्का पण बसलेला नाहीये. अजून याचा राग कमी झालेला दिसतच नाहीये." "मला पण तसंच वाटतंय. बरं, एनीवेज. मी जातो ऑफिसला. मला जरा शांतपणे विचार करायचा आहे. दुपारी फोन करतो तुला." मी सरळ ऑफिसला निघून आलो. मला ऑफिसकडून एका प्रोजेक्टसाठी सिंगापूरला जायचं होतं, निदान एक पाच-सहा वर्षांसाठी तरी. म्हणून मी अनू आणि ओमीला घेऊन जाणार होतो माझ्याबरोबर. हाच माझा निर्णय ओमीला आवडला नव्हता, ज्यामुळे तो माझ्यावर रुसून बसला होता. मी माझ्या प्रगतीसाठी त्याच्या भावनांचा विचार केला नाही, याचा विचार मनात सारखा येत होता.

दुपार झाली. माझ्या लक्षात आलं, घरी फोन लावायचा आहे. अनूला फोन लावला. तिला विचारलं, "काय ग, ओमी ओके ना? बराय का?" "काय सांगू? अरे, आज शाळेतच नाही गेला." "म्हणजे??" माझ्या आवाजात अविश्वास होता. "तो म्हणाला, 'मला जायचं नाहीये. आता इथे राहायचं नाहीये, तर शाळेत तरी कशाला शिकायचंय? इथल्या गोष्टींवर प्रेम कशाला करायचं?'" अनूचा आवाज आता पूर्णपणे काळजीचा होता. "अगं, हो. पण अजून जायला बरेच दिवस आहेत."

"अरे, मी खूप समजावलं, ऐकतच नव्हता. तो इतका हट्ट कधीच करत नाही." "बरं, संध्याकाळी घरी आलो की बोलतो त्याच्याशी."

संध्याकाळी घरी आलो. जरा फ्रेश झालो. अनूला म्हटलं, "ओमी कुठेय?" "अरे, गार्डनमध्ये खेळत आहे, बाहेर." "बरं, मी जातो आणि बोलतो त्याच्याशी." मी बाहेर आलो. ओमी एकटाच झोपाळ्यावर बसला होता, हलत पण नव्हता. मी त्याला म्हटलं, "मला बोलायचंय तुझ्याशी. ऐक ना. पाच मिनिटं बोलशील बाबांशी? शांत डोकं ठेवून विचार कर. मला काय म्हणायचंय, ऐकून तर घे." तो खाली बघतच म्हणाला, "बरं, बोल बाबा तू काय तुला बोलायचे ते." "आई मला म्हणत होती, आज तू शाळेत गेलाच नाहीस." "हो, नाही गेलो. आणि आता उद्या पण नाही जाणार आणि कधीच जाणार नाहीये." त्याच्या डोळ्यांत एक निर्धाराची चमक होती. "तसंही आपल्याला इथे राहायचं नाहीये. सिंगापूरला जायचंय. तर इथल्या शाळेत शिकून काय उपयोग आहे?" "अरे, सिंगापूरला जायला अजून वेळ आहे. म्हणून काय शाळेत जायचं नाही का? हा पर्याय नाही यावर. बरं, तुझ्याकडे वेळ आहे का? चल, बाहेर जाऊया. चल आईस्क्रीम खायला जाऊयात, फक्त आपण दोघे." "आत्ता?" त्याच्या आवाजात पहिल्यांदा थोडी उत्सुकता दिसली. "हो.. आई ओरडणार नाही. मी बोलेन आईशी."

आम्ही दोघेही चालत चालत आईस्क्रीमवाल्याकडे आलो. "अरे वा! खूप दिवसांनी आलात साहेब. भरपूर नवीन फ्लेवर आलेत आपल्याकडे!" "हो का? जेवढे नवीन फ्लेवर आहेत ना, ते सगळे द्या!" मी हसून त्याला म्हटलं. "काय ओमी, चालेल ना?" "हो, बाबा!" आईस्क्रीम हातात घेऊन आम्ही दोघेही चालायला लागलो. मी त्याचा हात हळूच हातात धरला. त्याला म्हटलं, "ओमी, चिडू नकोस ना. पण आपल्याला सिंगापूरला जायलाच लागणार आहे रे. माझं ऑफिसचं काम आहे." "अरे हो बाबा, पण मला अजिबात जायचं नाहीये!" त्याच्या स्वरातली शांतता अचानक तुटली. "अरे, सगळेच आहेत ना इकडे? नाना-नानी, माझा मित्रपरिवार, शाळा, माझे सगळे क्लासेस. इथे माझा एक पूर्ण जीव आहे, बाबा! आणि परत तिकडे सिंगापूरला जाऊन सगळं शून्यापासून सुरुवात करायची इच्छा नाही रे बाबा माझी. मला सगळे सोडून जायची भीती वाटतेय. प्लीज, मला समजून घे ना रे बाबा! नको जायला आपण. तू ऑफिसमध्ये सांगून टाक, मला काही सिंगापूरला वगैरे जायचं नाहीये. मला इथेच राहायचंय." त्याचे डोळे पाण्याने भरले. "अरे, जरा माझा पण विचार कर. काही गोष्टी शक्य नाहीत रे. तुला आवडेल सिंगापूर, नक्कीच आवडेल. तुझ्या भवितव्यासाठी हे आवश्यक आहे." "नाही म्हणजे नाही. मला सिंगापूरला जायचं नाहीये. बाबा, प्लीज ऐक ना!" तो आता धाय

मोकलून रडत होता. माझा हात सोडून तो घराकडे धावत सुटला. माझ्या हातात त्याच्या लहान हाताचा स्पर्श अजूनही जाणवत होता आणि त्याची ती निरागस रडण्याची किंकाळी माझ्या कानात घुमत होती. मी पण त्याच्या मागेमागे घरी आलो. घरी आल्यावर अनूला सांगितल.

अनू ऐकतच राहिली. तिच्या चेहऱ्यावर आता चिंतेची एक गडद रेषा उमटली होती. मला म्हणाली, "अरे, दिवसेंदिवस आता हट्टी होत चाललाय. सेट होईल ना रे तिकडे. पण मला आता खरंच भीती वाटायला लागली आहे. खरंच, आपलं जाणं एवढं गरजेचं आहे का? अरे, तसं बघता कुठल्या गोष्टीची कमी नाही रे आपल्याला. इथे सगळं सुरळीत छान चालू आहे. आपण त्याला दुःखी तर नाही करत ना?" "अनू, प्लीज आता तू पण! तू पण ओमीसारखीच म्हणायला लागलीस. मी तर पूर्णपणे एकटा पडलोय. मला वाटलं तू तरी माझी साथ देशील." "अरे, साथ आहेच माझी. पण ओमीचा विचार करायला हवा ना? बरं, बघू आपण काहीतरी होईल. बरं, जेवणार आहेस ना?" "नाही, नको. भूक नाही मला." माझ्या घशातून घास उतरणे शक्यच नव्हते. "एक काम कर. झोपायच्या आधी फक्त दूध देईन."

"आवरून येतो," असं म्हणून मी स्टडीमध्ये गेलो. थोडं ऑफिसचं काम करायचं होतं. ऑफिसचं काम करता करता रात्रीचे दोन कधी वाजले, कळलंच नाही. अनु आणि ओमी कदाचित गाढ झोपले असतील, असं मला वाटत होतं.

पण तेवढ्यात खालून कसलातरी दबक्या आवाजाचा सूर येत होता. तो आवाज कसला येतोय हे चेक करण्यासाठी मी खाली आलो. सगळीकडे भयाण शांतता होती. बघतो तर काय! ओमीच्या खोलीचा दरवाजा अर्धवट उघडा होता. मी सहज डोकावलं, अगदी नकळत. ओमी चक्क जागा होता. खोलीभर जुन्या खेळण्यांचा पसारा करून ठेवला होता. तिथल्या एकेक खेळण्याला तो निरोप दिल्याप्रमाणे हळूच हात लावत होता. भिंतीवर काढलेल्या त्याच्या चित्रांना, आवडत्या पोस्टर्सकडे एकटक बघत होता आणि गळ्यातील हुंदका दाबून घळाघळा रडत होता.

ते बघून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. ती खोली, तो एकटेपणा, तो रडण्याचा आवाज... सगळं काही क्षणात बदलून गेलं होतं. मला माझ्या बालपणीची आठवण झाली. खरंच, माझ्या बाबतीतही हे असंच झालं होतं. जेव्हा नानांनी मला सांगितलं होतं की, 'आपल्याला मुटाट सोडून कायमचं मुंबईत जायचं आहे.' पायाखालची

जमीनच सरकली होती माझ्या. काही म्हणजे काही समजतच नव्हतं. 'नाना असं काय म्हणतायत? नानांना कळत कसं नाहीये? माझं सगळं जग इथे आहे – मित्र, परिवार, नातेवाईक.' मी त्यावेळेला म्हटलं होतं, "नाना असं का करत आहेत? मला समजून का नाही घेत आहेत?" त्यावर नानी म्हणाली होती, "अरे, या छोट्याशा गावात तुझं काही होणार नाही रे. तुझ्या प्रगतीसाठी म्हणून नानांनी स्वतःची बदली मुंबईला करून घेतली. तुझं आयुष्य सुखकारक होईल. तुला वेगवेगळ्या गोष्टींची माहिती होईल." "अगं, सगळं मान्य आहे नानी, पण माझा विचार कर! नानी, तू बोल ना नानांशी! ऐकतील गं तुझं. माझं तर ऐकतच नाहीत ते." "नाही रे. आता काही होऊ शकणार नाही. आपल्याला जायलाच लागेल."

आणि खरंच नानांनी मला त्यावेळेला समजूनच घेतलं नाही. आम्ही मुंबईला आलो. मनात खूप राग होता नानांबद्दल. माझं जग तिथेच सोडून आलो होतो. नानांना कसं कळलं नाही माझे मित्र, त्यांच्याबरोबर केलेली धमाल, आमचं घर, घरातली माझी खोली, माझ्या खोलीतल्या माझ्या वस्तू, माझी शाळा, माझे शिक्षक... माझं सगळं सगळंच त्या गावात होतं. रेग्यांची ती सुलू, जिच्यावर मी मनापासून प्रेम करत होतो आणि तिचेही माझ्यावर प्रेम होते. अर्थात,

ते बालपणीतील प्रेम होतं, पण तरी पहिले प्रेम काय असते याची जाणीव मला त्या गावात झाली होती. या सगळ्या गोष्टींचा त्याग करून मी मुंबईला आलो होतो. पण मुंबईला आल्यावर मी मात्र या शहरात हरवून गेलो होतो. माझ्या एकटेपणाची कोणालाच जाणीव नव्हती. सगळे आपापल्या आयुष्यात अगदी बिझी होते. नानांनी जरी मला माझ्या प्रगतीसाठी इथे आणलं होतं, पण नकळत का होईना मी नानांपासून दूर जात होतो आणि अगदी एकटा पडलो होतो. माझं मन आतून रडत होतं. नानांनी जर माझं मन त्यावेळेला समजून घेतलं असतं, तर किती वेगळी दुनिया झाली असती आज!

आत्ता अचानक ओमीला असं बघून मला एकदम जाणीव झाली. मी पण तीच चूक करतोय, जी नानांनी केली होती. नानांनी त्यांच्या मुलाची प्रगती व्हावी ह्यासाठी हा निर्णय घेतला होता. पण मी काय करत होतो? मी स्वतःला सक्सेसफुल करण्यासाठी नकळत का होईना माझ्या मुलाला मी दुःखी करत होतो. मी जसा नानांपासून दूर झालो होतो, तसं मला ओमीला माझ्यापासून दूर नव्हतं करायचं

असं म्हणून मी चटकन खोलीत गेलो. ओमीला एकदम मिठी मारली आणि त्याला म्हटलं, "बाळा, प्लीज सॉरी बाळा! तू काही टेन्शनच घेऊ नकोस. ओमी, आपण हा देश आणि हे घर सोडून जायचं

नाहीये. मी उद्याच्या उद्या ऑफिसमध्ये सांगतो, मला नाही जमणार सिंगापूरला यायला."

ओमी माझ्या कुशीतून वर बघत म्हणाला, "खरंच? खरंच बाबा आपण माझ्यासाठी सिंगापूरला नाही जाणार?" "थँक्यू रे बाबा! तू माझा एवढा विचार केलास. मला किती छान वाटतंय ह्याची कल्पना नाही तुला."

मी ओमीला अधिक जवळ घेतलं आणि कडकडून मिठी मारली. त्याची छोटीशी छाती माझ्या कुशीत आता शांत झाली होती. त्या शांततेत, मला माझ्या बालपणीच्या खोलीतील एकटेपणाची जाणीव झाली. नानांनी प्रगतीसाठी जो निर्णय घेतला, तो योग्यच असेल; पण आज मला माझ्या मुलाचा आनंद प्रगतीपेक्षाही जास्त महत्त्वाचा वाटला.

मी ओमीला दिलेली ही मिठी, केवळ त्याला दिलेला दिलासा नव्हता; तर माझ्या बालपणातील त्या दुखावलेल्या 'मी'ला दिलेले ते समाधान होतं. आज मी वडिलांच्या भूमिकेत यशस्वी झालो होतो, जिथे नाना कमी पडले होते.

माझ्या डोळ्यांत पाणी तरळलं. मी हळूच वर पाहिलं आणि माझ्या जुन्या घराची आठवण काढत मनातल्या मनात नानांना म्हटलं, "नाना,

तुम्हाला जी मिठी मला त्यावेळी देता आली नाही, ती मी आज ओमीला दिली आहे. आणि हेच माझं यश आहे."

ओमी माझ्या खांद्यावर डोकं ठेवून शांतपणे श्वास घेत होता आणि मला त्या रात्री, पहिल्यांदाच, माझ्या आयुष्यातल्या सर्वात महत्त्वाच्या निर्णयावर समाधानाची गाढ झोप लागली.

स्वर्गातले हळदी कुंकू

"बाबा, अलकाताई आल्या की, त्यांना चार पोळ्या करायला सांगा. रवीच्या ऑफिसमध्ये पार्टी आहे आणि मला एका हळदीकुंकवाला जायचं आहे. त्यामुळे आज आमच्या पोळ्या नकोत. तुम्ही आणि मुलं जेवण करून घ्या. आमची वाट बघू नका. आम्हा दोघांनाही उशीरच होईल."

मी हसून म्हणालो, "अगं हो! तुम्ही आरामात या. आणि तू खूप एन्जॉय कर गं हळदीकुंकू. एक तर सारखी तुझी कामं चालूच असतात—ऑफिसची, घरची—तेवढाच तुला निवांत वेळ मिळेल."

"हो बाबा, नक्की करीन एन्जॉय," रूपा म्हणाली. "खरं तर हळदी-कुंकवाचा कार्यक्रम अर्ध्या तासाचा असतो. पण रील आणि फोटो या सगळ्यामुळे तो सहज एक-दीड तास चालतो, त्यामुळे मला वेळ लागेल."

"अगं, काही प्रॉब्लेम नाही! भेटू रात्री," असं म्हणून मी उठलो.

मी दार लावून घेतलं आणि भिंतीवरच्या मालूच्या फोटोजवळ गेलो. मालू, माझी पत्नी. मालूला जाऊन आता दोन वर्ष झाली होती. पण तुम्हाला गंमत माहीत आहे का? जगासाठी जरी मालू इथे नसली, तरी माझ्यासाठी ती माझ्या मनात होती. मालू फोटोतून माझ्याशी कायम गप्पा मारायची.

तुम्हाला वाटेल, 'हा म्हातारा वेडाबिडा आहे की काय?' पण तसं काही नाहीये. मालूचं आणि माझं हे सिक्रेट कोणालाच माहीत नाहीये. जेव्हा घरात कोणी नसतं, तेव्हा आम्ही एकमेकांशी खूप गप्पा मारतो.

फोटोजवळ जाऊन मी म्हणालो, "मालू मॅडम, गुड मॉर्निंग! अजून उठला नाहीत वाटतं?"

तिकडून आवाज आला, "हो ना! आज जरा उशीर झाला उठायला."

"उठायला उशीर झाला, काय झालं गं?"

"काही नाही हो. संक्रांत चालू आहे ना. त्यामुळे काय सांगू! रोज हळदीकुंकू चालू आहेत. आज इकडे, तर उद्या तिकडे."

"अरे बापरे! म्हणजे स्वर्गातही हळदीकुंकू आणि सेलिब्रेशन चालू आहे वाटतं?" "हो, मिस्टर बर्वे! स्वर्गातल्या बायकांना असं-तसं समजू नका. इथे सगळे सण, वार, सगळ्या गोष्टी आम्ही सेलिब्रेट करतो. स्वर्गात आलोय म्हणून काय, जगायचं सोडायचं की काय? काय मस्त सेलिब्रेशन चालू असतं, माहीत आहे? धमाल चालू आहे! प्रत्येक शनिवार-रविवार मी बिझी आहे."

"ते आलंच माझ्या लक्षात. आत्ता मागच्याच शनिवारी मी सारखा फोटोजवळ येत होतो. पण तू तर काय दिसतच नव्हतीस?"

"अहो, बरोबर! सकाळी पार्लरला गेले होते. दुपारी एका हळदीकुंकवाला जायचं होतं. त्यामुळे जरा म्हटलं, तयारीने जाऊया."

"अगं, कशाला? तू तशीच सुंदर दिसतेस."

"थँक्यू! तुमचं माझ्याकडे अजून लक्ष आहे."

"अगं, असणारच! माझं तुझ्यावर किती प्रेम आहे!"

"अहो, पण कसंय? इथे स्वर्गामध्ये जरा बायकांचं एकमेकांकडे जास्त लक्ष असतं. स्वर्गात आता कसली घरची किंवा कुठलीच कामं वगैरे नसतात. निवांत वेळ असतो. त्यामुळे जरा बायकांचं जास्तच लक्ष असतं. मग जरा मेकअप वगैरे करून जायला लागतं."

"हो का? उत्तम आहे! तुमचा वेळ जातोय ना, ते महत्त्वाचं आहे."

"हो, वेळ तर जातो, पण खर्चही थोडा जास्त होतोय, हो!"

"तो कसा?"

"अहो, सारखी-सारखी हळदीकुंकू लगेच आहेत ना. मग प्रत्येक हळदीकुंकूसाठी नवीन साडी. तीच साडी परत रिपीट व्हायला नको. मग तिथे उगाच चर्चा होते, 'अय्या! बर्वे काकूंनी मागच्या रविवारी हीच साडी नेसलेली. आज परत तीच नेसली!' उगाच का चर्चेला विषय द्यायचा इतरांना? म्हणून मग नवीन साडी खरेदीचा खर्च!"

"अगं, तसंही शॉपिंग हा तुम्हा बायकांचा आवडता विषय. त्यामुळे काय, होऊ द्या खर्च."

"थांबा हा! व्हॉट्सॲपवर कोणाचा तरी मेसेज आलाय. जरा बघते."

"अरे व्वा! काय गं? काय झालं? काय एकदम 'वाहवा' करायला लागलीस?" "अहो, त्या दोंदे काकू म्हणून आहेत, त्यांच्याकडे हळदीकुंकू आहे दोन आठवड्यांनी! त्याचं निमंत्रण आलंय. मी वाटच बघत होते. मी म्हटलं, यावर्षी दोंदे काकूंनी मला कसं बोलावलं नाही?"

"अगं, बोलावलं नाही तर नाही. विसरल्या असतील."

"नाही-नाही! असं कसं विसरून चालेल? अहो, स्वर्गात अशी परवानगी नाहीये, हा! एका बाईला असं विसरून हळदीकुंकू सेलिब्रेट करणं! अहो, आता काय सांगू! इतके ग्रुप झालेत ना, म्हणजे कसं—'स्वर्गातल्या सिनिअर सिटिझन्स', 'मग जरा मधले', 'मग माझ्यासारखे न्यू कमर्स' (असे एक-दोन वर्ष ज्यांना येऊन झाली आहेत) असे. त्यामुळे ज्यांच्याकडे हळदीकुंकू असतं, त्यांची मात्र अगदी पंचाईतच होते की, किती बायकांना बोलवायचं? मग तो दोन-तीन दिवस सोहळा चालतो—म्हणजे आज तीस बायका, उद्या तीस बायका, मग उरलेल्या थोड्या."

"हो का गं मालू? हे असं चालतं?"

"हो मग! अहो, काय सांगू! त्याच्याप्रमाणे मेन्यू पण ठरलेला असतो. म्हणजे जरा थोड्या 'हाय-प्रोफाइल' बायका असल्या की जरा छान मेनू—म्हणजे जरासं प्रेझेंटेशन वगैरे. एकदम छान, इम्प्रेस करण्यासारखं! मग आपल्या 'नॉर्मल' बायकांना ओके-ओके मेनू, एक नॉमिनल डेकोरेशन वगैरे."

"अगं, तिथे पण असा भेदभाव करतात का?"

"अहो, आहेच इथे असं! आता परवाच बघा ना. एक मिसेस गद्रे म्हणून आहेत, त्यांच्याकडे हळदीकुंकू होतं. मला शालिनी म्हणालीच, 'अगं, मिसेस गद्रे यांचं हळदीकुंकू ना खूप बोअर असते. त्यांचा मेनू वगैरे सुंदर असतो, पण अगदी अरसिक बाई आहे! स्वतः काही नटूनथटून नसते आणि इन्व्हिटेशनमध्ये पण असं आपल्यासाठी ड्रेस कोड वगैरे नसतो. एक तर रील तिला करायला अजिबात आवडत नाही, त्यामुळे मजा नसते गं अशा टाईपच्या हळदीकुंकूमध्ये.'"

"मग तू गेली होतीस का?"

"हो, जाऊन आले ना! पण आम्ही सगळ्या तशा लवकर सटकलो तिथून. शालिनी म्हणत होती, तेच! जरा बोअर झालो. आता कसं—दोंदे काकूंचं हळदीकुंकू म्हणजे एकदम बेस्टच असतं! काकू काय हौशीने रील करतात! अगदी म्हणजे एकदम वेल मॅनेज्ड! गेल्या गेल्या तुम्हाला असं कार्डवरती गाण्यांची लिस्ट! मग एका मोठ्या स्क्रीनवरती कुठल्या-कुठल्या स्टेप्स करायच्या, हे पण दिसत असतं. आणि खाण्यापिण्याची तर चंगळच असते! आणि जी बाई काकूंच्या हळदीकुंकूमध्ये आली, त्या बाईचं स्टेटस म्हणजे आता एकदम काही विचारूच नका! ती प्रत्येक कार्यक्रमात असायलाच पाहिजे आणि तिला प्रत्येकाने बोलवायला पाहिजे!"

"अगं हो! म्हणजे तुम्ही हळदीकुंकूसाठी भेटता, की रील्ससाठी?"

"आता तसेही काय! अहो, आम्ही स्वर्गातच आहोत. आता कुठलं हळदीकुंकू आणि कुठलं काय? आम्हाला काय, छान कपडे घालायचे, रील करायची, खायचं-प्यायचं, मजा करायची! आता ते हळदीकुंकू वगैरे—म्हणजे 'सुवासिनीचा वाण' वगैरे—हे आता सगळं ओल्ड फॅशन झालंय हो आमच्यासाठी! पण तरी आम्ही काय मस्त एन्जॉय करतो!"

"अगं हो, पण आपली संस्कृती!"

"अहो, बरोबर आहे तुमचं! तुम्हाला वाटणं साहजिकच आहे. अजून तुम्ही पृथ्वीवरचे आहात ना. तिकडचे विचार जरा जुनेच आहेत. पण आमचे विचार वेगळे आहेत! मी जेव्हा पहिल्यांदा इथे आले ना, हा सगळा प्रकार बघून मला पण फार वाईट वाटलं होतं की, हळदीकुंकवाची संकल्पना किती बदलली आहे. त्याच्या मागचा हेतू आता कायमचा दूर झालाय. 'हे काय चाललंय? इथे एकमेकांची स्पर्धा जास्त! कोणाला कुठे बोलावलंय, कोण काय करतंय, कोणी कसं खायला-प्यायला केलंय,' असं वाटलं. हळदीकुंकूच्या ऐवजी कॉम्पिटिशन जास्त झालीय, असं मला वाटलं. पण काय करणार हो? आता इथे स्वर्गात राहायचं, ह्या सगळ्यांबरोबर जुळवून घ्यायचं! म्हणून मी पण बदलले आणि वागायला लागले यांच्यासारखंच.

"हो गं, बरोबर आहे मालू. मला आणि आता मी बिनधास्त एन्जॉय करते!"काय वाटत होतं माहीत आहे का, की हा रीलचा सुळसुळाट ना फक्त आपल्याकडेच आहे. पण हे तर तुझ्याकडून ऐकल्यावर मला काहीतरी भलतंच समजतंय. म्हणजे, अगं, स्वर्गात पण रीलचा सुळसुळाट आहेच?"

"आमच्या स्वर्गाला काही कमी लेखू नका, तुम्ही! हो-हो! सॉरी, सॉरी! तुमचं स्वर्ग भारी आहे. बरं मालू, तिळगुळ घे आणि गोड बोल!"

"हो, पण स्वर्गात ना, 'तिळगुळ घ्या आणि गोड बोला' असं नाही म्हणत! इथे काय म्हणतात सांगू? 'तिळगुळ घ्या आणि खूप साऱ्या रील्स करा!'" "अरे बापरे! अगं थांब. कोणतरी आलेलं दिसतंय हा. अलकाताई आल्या असतील. मी दार उघडतो. अहो, आपण उद्या बोलूया. तशी मला पण आता घाईच आहे. जरा शॉपिंगला जायचं!"

"मालू! आता कशाला शॉपिंग?"

"काय हो! इतक्या वेळ काय बडबड केली मी? दोन आठवड्यानंतर दोंदे काकूंकडे हळदीकुंकू आहे ना. तिथे छान दिसायला पाहिजे! म्हणून मी मॉलमध्ये जाऊन मस्त शॉपिंग करते. छान साड्या वगैरे घेते."

"अहो, माझं एक काम करा. रात्री रूपा आली की, तिला विचारा तिचं हळदीकुंकू कसं झालं आणि तिला सांगा, जमलं तर सोशल मीडियावर जरा फोटो आणि रील पोस्ट कर. म्हणजे मला तेवढीच आयडिया येईल की, काय केली यांनी मजा. आम्ही पण आमच्या रीलमध्ये तसंच काहीतरी वेगळं करू. आणि कळेल ना की तुम्ही तिकडे जास्त मजा करताय, का आम्ही! बरं, चला आता बाय-बाय. अल्का मावशीने परत बेल वाजवली आहे. जा, ताबडतोब आणि दार उघडा!"

"बरं, चल. बाय! जा तू शॉपिंगला आणि मजा कर!"

तुपाची धार

हे काय अलार्म झाला? आत्ता कुठे डोळा लागला होता आणि एवढ्यात सकाळ झाली? मी कुशीवरून वळून बघितलं, तर बाजूला रमा नव्हतीच आणि घरात नेहमीसारखा लगबगीचा आवाजही नव्हता. रमा चक्क माझ्या आधी उठली होती. नक्की काय झालंय हे बघण्यासाठी मी उठून बाहेर जाणार इतक्यात रमा आत आली.

"गुड मॉर्निंग, राघव! झाली ना रे झोप? चल आता पटकन ब्रेकफास्ट करून घे. तुझी नऊ वाजता मीटिंग आहे ना? नवीन ऑफिसच्या जागेसाठी. माझ्या लक्षात होतं, म्हणून लवकर उठले. आज मुलांना मी सोडायला जाईन म्हणजे तुझी गडबड नको व्हायला."

"अगं, मी विसरूनच गेलो होतो! खरंच तू आठवण करून दिलीस. डॅनियलचा काही फोन आला का? तो मला पिकअप करायला येणार आहे."

"हो, त्याचा फोन आला होता. तो येणार आहे, म्हणूनच म्हणते तयार राहा. डॅनियलसारखा पार्टनर मिळाला म्हणूनच आपण सिडनीसारख्या ठिकाणी स्वतःच्या आयटी कंपनीचं स्वप्न पूर्ण करू शकतोय," रमा अभिमानाने म्हणाली.

"हो गं, खरंय! तुमच्या सगळ्यांच्या साथीनेच मी एवढी मोठी झेप घेतोय. बरं चल आता आवरून घेतो."

डॅनियल ठरलेल्या वेळेला मला आणायला आला. मीटिंग मस्त झाली आणि नवीन ऑफिसची जागा दोन आठवड्यांत ताब्यात येणार होती. घरी परतल्यावर मी आई-बाबांना फोन करायचं ठरवलं, ही 'गुड न्यूज' देऊन त्यांना सरप्राईज करायचं होतं.

मी फोन डायल करणार, तेवढ्यात आईचाच फोन आला.

"अगं आई! शंभर वर्ष आयुष्य! आत्ता तुलाच फोन करणार होतो. कशी आहेस? तुला एक गुड न्यूज..."

"राघव, तुला एक महत्त्वाचं सांगायचंय. ऐक ना... नानीची तब्येत ठीक नाहीये. ती सारखी तुझी आठवण काढत आहे. थोडी सुट्टी घेऊन येऊ शकशील का? कदाचित ही नानीची आणि तुझी शेवटची भेट असेल. प्रयत्न कर. जमल्यास ये," असं म्हणून आईने फोन ठेवला.

मी स्तब्ध झालो. माझ्या नवीन कंपनीच्या उत्साहाला एका क्षणात ब्रेक लागला. नानीला शेवटच्या दिवसांत माझी आठवण येत होती. माझं जाणं भागच होतं. मी लगेच डॅनियलला फोन लावला आणि त्याला सगळं सांगितलं.

डॅनियल शांतपणे म्हणाला, "काही प्रॉब्लेम नाही. फॅमिली पहिली महत्त्वाची. तू आल्यानंतर आपण डील फायनल करू."

मुलांच्या शाळांमुळे रमा आणि मुले येऊ शकत नव्हते. मी इमर्जन्सी तिकीट काढलं आणि थेट रत्नागिरी गाठलं.

किती वर्षांनी येत होतो मी रत्नागिरीला! माझ्या नानांनी (आजोबांनी) हेडमास्तर म्हणून आणि आई-बाबांनी डॉक्टर म्हणून कमावलेलं प्रेम आणि मान रत्नागिरीत अजूनही कायम होता. आणि नानी... तिच्यासारखी प्रेमळ आणि सुगरण बाई मी पाहिली नव्हती.

मी घरात प्रवेश केला. आई-बाबा मला बघून म्हणाले, "राघव, तू आलास ते बरं झालं. नानी चार-पाच दिवसांपासून फक्त तुझंच नाव घेतेय. आता वय झालंय रे. फार दिवस काढतील असं वाटत नाही. म्हणून म्हटलं, एक शेवटची भेट तरी व्हावी."

मी आत गेलो. नानी बेडवर झोपून होती. मी तिचे सुरकुतलेले, मऊ हात हातात धरले. मला अचानक जाणवलं, बापरे! मी कामात एवढा गुंतलो की, नानीसाठी असा निवांत वेळ कधी दिलाच नाही.

"नानी, कोण आलंय? ओळखलंस का?"

"अरे, न ओळखायला काय? माझे डोळे जरी गेले असले, तरी कान शाबूत आहेत राघवा! बरं वाटलं रे तू आलास. मुलं आणि रमा नाही का आले?"

"तू आधी बरी हो, मग ते नक्की येतील. तू आता आराम कर."

जेवण करताना मी उत्साहाने आई-बाबांना सिडनीतील कंपनी आणि माझ्या यशाबद्दल सांगितलं. ते खूप खुश झाले. "अरे बाळा, परदेशात एवढी मोठी झेप! ही खूपच कौतुकाची गोष्ट आहे. नानीला पण सांग, तिलाही अभिमान वाटेल तुझा."

"हो, नक्कीच सांगतो."

दुसऱ्या दिवशी नर्स आणि आई नानीच्या खोलीतून हताश होऊन बाहेर आल्या.

"राघव, तूच बघ रे. नानी काहीच घेत नाहीये. सांगून आम्ही थकलो."

मी नानीच्या खोलीत गेलो. "नानी, हे काय चाललंय? काहीच का घेत नाहीस?"

"अरे तसं काही नाहीये. पण मला काही इच्छाच होत नाही. सगळ्या इच्छा-आकांक्षा पूर्ण झाल्या. आता बास झालं असं वाटतंय."

"अगं नाही, असं कसं म्हणतेस? तुला एक आनंदाची बातमी सांगायची आहे."

"अरे, आता काय तिसरा मेंबर येतोय की काय आपल्या घरात?" तिने हलकेच हसून विचारले.

"अगं तसं नाही. एक वेगळी बातमी आहे. ऐक, आधी घोटभर चहा घे बघू. त्याशिवाय मी सांगणार नाही."

"ठीक आहे. नर्स बाई, द्या बघू थोडासा चहा."

"व्हेरी गुड! नानी, मी सिडनीमध्ये माझी स्वतःची आयटी कंपनी चालू करतोय."

मी हे सांगितल्यावर नानीच्या चेहऱ्यावर काहीच प्रतिक्रिया नव्हती. ती शांतपणे डोळे मिटून पडून राहिली.

मी उत्साहित होऊन पुन्हा विचारलं, "नानी, कळलं ना तुला? मी काय म्हटलं ते. अगं, माझी कंपनी!"

नानीने डोळे उघडले, पण तिच्या नजरेत एक तीव्र निराशा होती. "हो, कळलं मला ते. म्हणजे तू पण तेच करतोयस... स्वतःच्या स्वप्नांचा, इच्छांचा चुराडा. ठीक आहे. मला जरा आराम करायचा आहे. तुम्ही सगळे येथून बाहेर गेलात तर बरं होईल."

मी गोंधळलो आणि उदास होऊन बाहेर आलो.

संध्याकाळी मी वरण-भात घेऊन नानीजवळ बसलो. पहिला घास खाल्ला. काहीतरी कमी वाटलं, पण मी दुर्लक्ष केलं.

इतक्यात नानी म्हणाली, "अरे, तुपाची धार सोडली नाही का भातावरती?"

मी चमकलो. "नाही. तुला कसं कळलं? तुला दिसत नाही, तू चव पण घेतली नाहीस!"

"मला वासावरून कळलं! माझ्या स्वयंपाकावरचं प्रेम तुला माहीतच आहे."

मी लगेच आत जाऊन भरपूर तूप भातात घातलं आणि चव घेतली. "हा! आता हा भात अगदी पूर्वीसारखा, नानीच्या हातच्या भातासारखा लागतोय. तू कसली ग्रेट आहेस गं नानी!"

नानीचा हात माझ्या डोक्यावरून फिरला. "राघवा, तुला आठवतंय का, लहान असताना तू माझ्या बाजूला उभं राहून किती निरीक्षण करायचास—'नानी, ह्याच्यात काय घालायचं, त्याच्यात काय घालायचं?' आणि ते सगळं एका वहीत लिहून ठेवायचास?"

"हो, थोडंफार आठवतंय."

"तू एका वाढदिवसाला मला एक उत्कृष्ट पेन आणि एक वही दिली होतीस. आणि मला म्हणालीस, 'ह्याच्यात तुझी सगळी स्वप्नं लिहून काढ.' हो ना मग तुला त्या वहीत लिहिलेली स्वप्नं आठवत नाहीयेत. एक काम कर, ते समोरचे कपाट उघड. त्याच्यात एक जुनी वही असेल, ती बाहेर काढ. नानी राहूदे आत्ता कुठे खूप उशीर झाला आहे असुदे . माझी इच्छा आहे म्हणून काढ."

मी कपाटातून ती जुनी वही बाहेर काढली. नानी म्हणाली, "आता मी झोपते. तुला वेळ मिळाला तर ती चाळ."

रात्री खोलीत बसून मी ती वही उघडली. बापरे! एकूण एक गोष्ट मी लिहून ठेवली होती— पदार्थांची नावे, मेनू, हॉटेलचं नाव... 'हॉटेल तुपाची धार'.

माझं लहानपणीचं स्वप्न होतं, रत्नागिरीत अस्सल मराठमोळं रेस्टॉरंट काढायचं. पण बाबांच्या इच्छेनुसार मी इंजिनियर झालो आणि हे स्वप्न विसरूनच गेलो. आता मला नानी काल चिडून का बोलली हे स्पष्ट कळलं. मी माझ्या स्वप्नाचा बळी दिला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी नानीच्या खोलीत गेलो. नानी तशी अर्धवट झोपेत होती.

"नानी! नानी! मी काल ही वही चाळली आणि माझे डोळे उघडले. तू बरोबर म्हणत होतीस. मी माझ्या स्वप्नांचा चुराडा केला गं. या धकाधकीच्या जीवनात मी माझी खरी इच्छा विसरूनच गेलो."

"चुराडा नाही रे. फक्त वाट चुकली होतीस. आता लवकर निर्णय घे."

मी लगेच रमाला फोन लावला. तिला घडलेला सगळा प्रकार सांगितला आणि माझा नवीन निर्णयही सांगितला. तिने आनंदाने तो स्वीकारला.

डॅनियलला फोन करून मी स्पष्ट सांगितलं, "सॉरी मित्रा, आयटी कंपनी नाही... मी आता 'तुपाची धार' नावाचं मराठमोळं रेस्टॉरंट काढणार आहे."

डॅनियल हसला. "राघव, मला तुझ्यावर विश्वास आहे. आपण तुझं स्वप्न नक्कीच साकार करू. मी तुझ्या बाजूला आहे."

मी परत नानीच्या खोलीत आलो. आई-बाबा नानीच्या जवळ बसले होते.

मी नानीच्या सुरकुतलेल्या हातात वही ठेवली आणि तिचा हात हातात घेतला. "आई, बाबा... आणि नानी. मी माझा विचार बदलला आहे. सिडनीमध्ये आयटी कंपनी सुरू करण्याऐवजी, मी आता 'तुपाची धार' नावाचे अस्सल मराठी रेस्टॉरंट सुरू करत आहे! हे माझं लहानपणीचं स्वप्न आहे, जे नानीने जपून ठेवलं."

आई आणि बाबांनी एकदम आनंदाने होकार दिला. "अरे वाह! ही तर खरंच खूप मोठी आणि खास बातमी आहे!"

नानी शांत होती, पण तिच्या चेहऱ्यावर एक वेगळीच चमक आली होती. तिने माझा हात दाबला आणि हळूच म्हणाली, "राघवा... मला

माहीत होतं, तू परत येशील. तू तुझी वाट विसरला होतास, पण तुझा वास... तो भातावरच्या तुपाच्या वासासारखाच होता. शुद्ध आणि खरा."

नानीने तिच्या उशाजवळ ठेवलेली एक छोटी, लाकडी पेटी काढली. "हे घे. या वहीत फक्त स्वप्नं होती, पण या पेटीत जुन्या, अस्सल पाककृती आहेत. माझ्या आईकडून माझ्याकडे आलेल्या. 'तुपाची धार' या पाककृतींशिवाय अपूर्ण आहे. हे तुझ्यासाठी... तूच खरा वारसदार आहेस."

तिचे डोळे आता समाधानाने भरले होते.

मी त्याच क्षणी वरण भात घेऊन आलो आणि नानीला घास भरवला. तुपाच्या धारेसह! तिने तो घास डोळे मिटून खाल्ला.

"मी तयार आहे राघवा! तुझ्या 'तुपाची धार' मध्ये पहिला ग्राहक म्हणून मीच येईन!"

प्रत्येक घरात अशी एक नानी असायलाच पाहिजे, जी आपल्याला जाणीव करून देईल— जगा, स्वतःसाठी जगा आणि आपल्या स्वप्नांसाठी जगा. राघवच्या वहीतली स्वप्नं आता खरी होणार होती.

दोन शब्द

श्री दत्त मंदिराच्या पायऱ्या उतरताना अतुल बर्वे यांच्या चेहऱ्यावर कीर्तनाची शांत समाधानाची छटा होती. "काय म्हणतेस, शामा? आज खूप दिवसांनी बुवांचं कीर्तन ऐकलं. खरंच, मन अगदी शांत झालं!"

शामाच्या हातात मंदिरातल्या प्रसाद म्हणून मिळालेल्या फुलांची माळ होती. ती माळ नीट करत म्हणाली, "हो ना? कीर्तनात मन रमायला हवं, पण माझं लक्ष..."

अतुल हसले, "पण तुझं लक्षच नव्हतं. तू त्या एका परिकथेतील बाहुलीसारख्या मुलीशीच बोलत होतीस, हो ना? ती किती गोड होती ना? एकदम चिमुरडी, पण बोलकी. तिचं नाव काय ग?"

शामाच्या डोळ्यांत एक हलका ओलावा जमा झाला. "राधा कर्णिक. तुला काय सांगू! मी केलेला मुगाचा हलवा तिला एवढा आवडला की काय सांगू! ती सारखी माझ्याकडे येत होती आणि जवळ बसून म्हणत होती, 'आजी, मला थोडासा खाऊ देतेस?' तिची ती निरागसता बघून मला अगदी आपल्या राघवच्या लहानपणीची आठवण आली."

"हो. राघवलाही खूप आवडतात ना तुझ्या हातचे सगळे पदार्थ," अतुल उत्साहाने म्हणाले. "अगं, तू खरंच मास्टरशेफ आहेस! मस्करी नाही करत, खरंच सांगतोय."

शामा हसली, "मास्टर शेफ वगैरे काय! मी एक साधी गृहिणी आहे. जसा जमेल तसा स्वयंपाक करते."

"नाही, नाही. तसं नाही. स्वयंपाक उत्कृष्ट करतेस आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे तू एवढं प्रेमाने करतेस ना सगळ्यांसाठी!"

शामा घड्याळाकडे पाहून म्हणाली, "पुरे झालं कौतुक, मिस्टर बर्वे. उशीर होतोय. घरी जाऊया ना?"

"हो, जाऊया. चल."

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे आम्ही मंदिरात गेलो. आम्हाला बघून ती कालची मुलगी—राधा—पटकन माझ्याकडे धावत आली आणि म्हणाली, "आजी, तू हलवा आणला आहेस का ग? मला दे ना थोडासा!"

शामा हसतच म्हणाली, "नाही गं बाळा. आज नाही आणला हलवा."

तेवढ्यात एका महिलेने राधाला हाक मारली, "राधा! ए राधा, इकडे ये बाळा." ती महिला आमच्या जवळ आली. "ही बघ! हीच ती आजी, हिने काल तो हलवा केला होता."

तिने आम्हाला नमस्कार केला, "नमस्कार, मी आरती कर्णिक. राधाची आई."

शामानेही स्वतःची ओळख सांगितली, "नमस्कार, मी शामा बर्वे आणि हे अतुल बर्वे."

"हो का? अहो, तुमचा हलवा राधाला एवढा आवडला! घरी जाऊन बाबांना, आजीला सगळ्यांना सांगत होती की एका आजीने मंदिरात इतका छान हलवा केलेला. आज दुपारीच म्हणाली, 'आई, आज आपण परत जाऊया. ती आजी नक्की येईल आणि तू तिला विचार की तो हलवा कसा करायचा ते मला सांगाल का?' कारण तो हलवा करणं खूप कठीण असतो..."

शामा म्हणाली, "तुम्ही कशाला कराल? मी करेन की परत."

"फार गोड आहे तुमची मुलगी," अतुल म्हणाले.

शामा पुढे बोलू लागली, "राधासाठी मी नक्की करेन, पण आत्ता मला जमणार नाही. आम्ही दोघं जण मुलाकडे एक-दोन महिन्यांसाठी

जातोय. आल्यानंतर मी नक्की तुम्हाला करून देईन. तुमचा ॲड्रेस आणि फोन नंबर द्याल का मला? म्हणजे मी तुम्हाला संपर्क करेन."

"हो, नक्कीच."

दोघांनी आपापले फोन नंबर आणि पत्ते शेअर केले. मग आम्ही दोघं दोन महिन्यांसाठी राघवच्या कडे, अमेरिकेत गेलो. मुलांबरोबर मस्त दोन महिने धमाल करायचं सुख काही वेगळंच असतं. राघव तर एवढा आतुरतेने आमची वाट बघत असतो की आई कधी येणार आणि आईच्या हातचे पदार्थ कधी खाणार!

राघवचे मित्रही शामाचं कौतुक करत असतात. शामा आहेच अशी—सतत दुसऱ्याचा विचार करणारी, दुसऱ्यांना आनंद कसा देता येईल हे ती बघत असते. म्हणूनच मला तिचं कौतुक वाटतं. काही वेळेस वाटतं की हा वेडेपणा आहे, आपल्याला त्यांची इतकी ओळख आहे की नाही याचा विचार न करता सतत त्यांच्यासाठी काहीतरी करायचं. याची गरज काय? पण मग मी विचार करतो, शामाला त्यातून आनंद मिळतो ना! ती म्हणते, "कुकिंग हा माझा श्वास आहे."

आमचे दोन महिने कधी संपले, हे कळलंच नाही. आम्ही परत भारतात आलो. रोजचं रूटीन चालू झालं. रोज संध्याकाळी मंदिरात जाऊ लागलो.

खूप दिवस झाले, राधा काही दिसलीच नाही. शामा मला म्हणाली, "कुठे गेली असेल हो राधा? दिसतच नाहीये ना. माझ्या लक्षात आहे तिच्यासाठी हलवा करायचा आहे. एक काम करूया का? आपल्याकडे

पत्ता आहे ना? तुम्ही सामान आणून द्या मला. मी हलवा करते आणि तुम्ही उद्या त्यांच्याकडे नेऊन द्या."

"यस मॅडम. तुम्हाला कधी नाही म्हटलंय का?" मी हसलो. "घरी जाता जाता सामान घेऊन जाऊयात. तू कर हलवा. तू काही टेन्शन घेऊ नकोस. उद्या मी नेऊन देईन."

घरी आल्यावर शामाने राधाच्या आईला फोन लावला आणि विचारलं, "उद्या तुम्ही घरी आहात का? मी राधासाठी खाऊ पाठवते."

त्या म्हणाल्या, "अहो, उद्या सकाळी घरी कोणीच नसेल, पण तुम्ही एक काम करा. मी वॉचमनजवळ निरोप देते. तुम्ही डबा वॉचमनजवळ ठेवून द्या, काही प्रॉब्लेम नाही."

"बरं, बरं, चालेल. तसंच करते." असे म्हणून शामाने फोन ठेवला.

जेवण झाले आणि आम्ही दोघे टीव्ही बघत बसलो. टीव्ही बघता बघता शामा डुलक्या काढत होती. मी विचारलं, "शामा, झोपली आहेस का?"

"नाही हो. थोडं थकल्यासारखं वाटतंय आणि थोडा ताप आल्यासारखा वाटतोय."

"ताप?" मी ताप चेक केला आणि बघतो तर काय? १०३ फॅरनहाईट! "अगं शामा! बराच ताप आहे. तू लगेच आराम कर. झोपायला चल."

शामा डोळे मिटून हळूच पुटपुटली, "हो, हो, झोपतेच. पण उद्या हलवा..."

"मॅडम, आपली तब्येत जास्त महत्त्वाची आहे. तो हलवा वगैरे... सध्या तरी कॅन्सल!" मी तिचा हात पकडला.

असं म्हणून आम्ही झोपलो. का कुणास ठाऊक, शामाला खरंच बरं नव्हतं वाटत. रात्री तिला नीट झोप लागली नाही; ती सारखी कण्हत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी पाच वाजता मला जाग आली, तर शामा स्वयंपाकघरात हळू आवाजात भांडी वाजवत होती! "शामा! तू काय करते आहेस?" मी दचकून विचारले.

ती थकल्या आवाजात म्हणाली, "पाचच वाजलेत, अतुल. मला करू द्या."

"अगं, काल तुला १०३ ताप होता! तू ऐकतेस की नाहीस? एका हलव्यासाठी तू स्वतःला त्रास करून घेते आहेस!"

शामा माझ्याकडे वळली. तिच्या डोळ्यांत एक वेगळीच तळमळ होती. "तुम्हाला कळणार नाही. मला चैन पडत नाहीये. मी त्या लहान मुलीला शब्द दिला आहे. दोन महिने उशीर झाला आहे. मला करू द्या, अतुल. माझ्यासाठी हे फक्त 'कुकिंग' नाहीये!"

"बरं, ठीक आहे. पण मी इथे उभा राहणार आहे हा! तुला काही होईला लागलं तर."

असं म्हणून आम्ही स्वयंपाकघरात उभे राहिलो. काय बोलू शामाबद्दल! एवढा अंगात ताप पण कमाल आहे ती! अगदी पटकन हलवा तयार.

"चला, चला. मी डब्यात हलवा भरते. तुमच्याकडे राधाचा पत्ता आहे ना? मग तुम्ही हा डबा त्या वॉचमनकडे द्या आणि त्याला सांगा, 'कर्णिक मॅडमचा डबा आहे, त्यांना आठवणीने द्या.'"

"अगं, हो, हो. मी जातो."

"ते काही नाही, आत्ता जा. बाहेर खूप ऊन आहे. थोडं ऊन कमी झाल्यावर जातो."

"नाही, नाही हो. काही होत नाही. टोपी घालून जा."

"बरं मॅडम, मी जातो."

मी टोपी घालून गेलो. खरंच रस्त्यामध्ये भयंकर ऊन जाणवत होतं. ऑक्टोबर हीट चालू झालीय. सुदैवाने पत्ता पण लगेच मिळाला. ठरल्याप्रमाणे मी वॉचमनच्या हातात डबा दिला आणि त्याला म्हटलं, "कर्णिक मॅडम कडे दे." तो म्हणाला, "हो आजोबा, मॅडमनी सकाळीच सांगितलेलं होतं. मी देतो."

घरी आलो. आल्या आल्या शामाने विचारलं, "दिलात ना डबा?"

मी म्हणालो, "हो, दिला. आता तू जरा बरी वाटतेस."

"हो, बघा. मी म्हटलं ना, कुकिंग माझा श्वास आहे. तो मी घेतला आणि बरी झाले."

"खरंच तुझं कौतुक करावं तेवढं कमी आहे. ताप नाहीये ना आता?"

"नाही, आता नाहीये."

संध्याकाळी देवळात जायच्या आधी शामा मला म्हणाली, "मी एकदा आरतीला फोन लावून विचारू का की तिला डबा मिळाला ना?"

"अगं, कशाला? करेल ना ती. गडबडीत असेल."

"नाही, नाही. मी लावतेच."

शामाने फोन लावला. "हॅलो आरती, शामा बोलतेय. मिळाला ना डबा? हो. बरं बरं. हो का? हा. आणि राधा... राधाला दिलास ना? बरं, बरं. हो का? हो, नाही, नाही. चालेल, चालेल. चला, चला. अच्छा." असे म्हणून शामाने फोन ठेवला.

मी तिला म्हटलं, "शामा, काय झालं गं?"

ती नजरेला नजर न भिडवता पटकन आत वळणार होती.

मी तिला थांबवले. "शामा, काय झालं गं? चेहरा का उतरला आहे?"

ती हलकेच हसण्याचा प्रयत्न करत म्हणाली, "काही नाही. आवडला हा त्यांना हलवा."

"शामा, मी तुमचा आवाज ऐकला. तू मला खोटं सांगू नकोस."

शामाचा बांध तुटला. ती हळूच म्हणाली, "अहो, झालं असं की... डबा मिळाला, राधाने खाल्ला. पण आरती... आरतीने एकही शब्द बोलली नाही की तो छान झाला होता. ती नुसती 'हो, चालेल' एवढंच

म्हणाली. जाऊ दे. मी इतक्या प्रेमाने, तब्येत नसताना केलं... पण आता वाटतं, कशासाठी?"

मला हे कळलं होतं की आरतीने त्या हलव्याबद्दल एक शब्दही बोलली नसेल. शामाला वाईट वाटणं साहजिक होतं. त्या आरतीने दोन शब्द 'थँक्यू' किंवा 'छान झाला आहे' असे खोटं खोटं का होईना, म्हंटले असते तर तिचं नुकसान थोडीच झालं असतं? मला हेच कळत नाहीये. आजकाल लोकांना एकमेकांचं कौतुक करणं तर जड झालं आहेच, पण दोन प्रेमाचे शब्द बोलणंही जड झालंय.

मी सरळ तिच्या जवळ गेलो. "शामा, तिच्या 'दोन शब्दां'ची वाट बघू नकोस. ती आरती काय बोलली याने काही फरक पडत नाही."

मी तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि तिच्या डोळ्यांत बघून हळू आवाजात म्हणालो, "माय डियर मास्टरशेफ, थँक्यू."

शामा माझ्याकडे बघून म्हणाली, "थँक्यू? थँक्यू कशासाठी?"

"अगं, फक्त राधासाठी नाही. एवढा ताप असताना तू जो हलवा केलास, तो तू माझ्यावर आणि इतरांवर केलेल्या प्रेमाचा पुरावा आहे. मला ठाऊक आहे तो किती अप्रतिम असणार. तू सकाळी स्वयंपाकघरात उभी राहून जो आनंद मिळवलास, त्यासाठी आणि

फक्त 'तू' आहेस म्हणून, खरंच थँक यू. आणि आता तू तो मलाही खायला देणार आहेस."

माझं 'थँक्यू' ऐकून शामाच्या चेहऱ्यावरचा उदासपणा एका क्षणात वितळला. तिच्या डोळ्यांत पुन्हा ती नेहमीची चमक दिसली. माझा हात घट्ट पकडून ती आनंदाने हसली. तिचा तो आनंदी चेहरा बघून मला जे समाधान मिळालं...

खरंच, 'दोन शब्दां'मध्ये इतकी ऊर्जा आणि जादू दडलेली आहे, जी कधीकधी औषधापेक्षाही जास्त प्रभावी ठरते. मी ठरवलं, खरंच, दोन शब्दांनी इतकी कमाल होत असेल, तर ते नक्की बोलावेत असं मी आवर्जून सांगेन.

खिडकी

दामूने दारावर हलकेच टकटक केली. हळूहळू खोलीत सकाळचा प्रकाश पसरला होता, पण मेजर साहेबांच्या चेहऱ्यावर रात्रीच्या वेदनांची एक जड छाया होती.

दामू: "मेजर साहेब... अहो मेजर साहेब. उठा की, ब्रेकफास्ट घेऊन आलोय."

मेजर साहेब हळूच दबलेल्या स्वरात कण्हले.

दामू: "काय, आज... खूप बरं नाहीये की काय?"

मेजर साहेब: "हो, थोडं अंग जड झालंय, पण उठतो. किती वाजले?"

दामू: "साडेअकरा झाले, मेजर साहेब."

मेजर साहेब: "इतके वाजले? मी तोच विचार करत होतो. मंडळी गेली कुठे? कोणीच कसं आलं नाही पाहायला? मी जिवंत आहे की नाही, हे तरी..." (वाक्य अर्धवट सोडतात.)

दामू: "अहो, तसं बोलू नका! अशोक दादांची तर आज पहाटेच मीटिंग होती. आणि शोभा वहिनी आणि मुलं आज लवकर शाळेत गेले. शाळेत मोठा कार्यक्रम आहे म्हणे. मी आलो होतो दोनदा. तुम्ही इतके गाढ झोपले होतात की वाटलं, झोपू द्यावं शांत. आता म्हटलं, उठा आणि शक्तीसाठी काहीतरी खाऊन घ्या."

मेजर साहेब: "शक्ती? आता कशासाठी शक्ती?..." (ते पुन्हा शांत झाले.)

दामू: "बरं, तू खाऊन घे. मी थोडं काम करून येतो."

दामू निघून गेला. मेजर साहेब हळूहळू बेडमध्ये उठून बसले.

समोरच्या टेबलावर ठेवलेल्या मधूच्या फोटोकडे त्यांनी डोळे भरून पाहिले. 'मधू, का ग मला एकटं सोडलं? का ग सोडून गेलीस एवढ्या लवकर? निदान माझ्या मुलांना तुझी तरी गरज होती. ह्या अपंग, असहाय्य बापाचा त्यांना काय उपयोग? मी त्यांच्यासाठी फक्त एक जबाबदारी झालोय!'

एकहत्तरच्या युद्धात माझे दोन्ही पाय गेले. पायांसोबत माझे तेज, माझे शौर्य, माझे भविष्य, सगळं काही गेलं. मला आठवतंय ना? माझे पाय बरे व्हावेत म्हणून तू देवाकडे किती वेळा नवस केला होतास. तू

कुठे कुठे घेऊन जायचीस मला, पण नाही... नियतीला काहीतरी क्रूर आणि वेगळंच मंजूर होतं. खरे सांगायचे तर, त्या पराभवाने तू मनाने खूप खचून गेली होतीस, पण तुझं दुःख तू कधीही माझ्यासमोर येऊ दिलं नाहीस. माझ्या छातीवर हात ठेवून कायम म्हणायचीस, 'मेजर लवकर बरा होणार आहेस बघ. माझा विश्वास आहे, माझ्या शब्दांवर विश्वास ठेव.'

आता कुणाचा विश्वास उरलाय? माझा स्वतःचाही नाही. मी बरा होऊन तरी काय होणार? मला कोण भेटणार? कुणाला माझा आधार वाटणार? घरात सगळे आपापल्या जगात गढलेले आहेत. अपेक्षा तरी काय ठेवणार? मी म्हणजे आता फक्त एका अडगळीच्या खोलीतील जुने फर्निचर झालो होतो.

इतक्यात दामू परत आला.

दामू: "चला मेजर साहेब! उठा! आता अंघोळ घालतो तुम्हाला. मग एकदम माणूस झाल्यासारखं वाटेल."

मेजर साहेब: "माणूस?... हो, चल बघू."

अंघोळ करून ते बाहेर आले.

मेजर साहेब: "चला दामू शेठ, व्हीलचेअर तिथेच ठेवा."

दामू: "साहेब, खरं सांगायचं तर मला कळत नाही या खिडकीचं तुमचं काय गुपित आहे ते! पण मला इतकं माहीत आहे, जोपर्यंत तुम्ही इथं बसता, तोपर्यंत तुमच्या चेहऱ्यावर एक वेगळी शांती दिसते. चला, बसा. मी थोडी कामं करून येतो. पण लवकर या!"

मेजर साहेब: "ये निवांत ये. मी आहे इथेच. मी कुठे जाणार?"

'तू काय सांगणार दामू, या खिडकीचं मोल! तू फक्त माझा सेवक आहेस. ती खिडकी माझा श्वास आहे, माझा संपूर्ण देश आहे.'

मी हा असा अपंग माणूस, चार भिंतीत बंद. ही खिडकीच माझा विरंगुळा आहे. या खिडकीतून दिसणारी रस्त्यावरची ती साधी माणसं... त्यांची धडपड... धावणाऱ्या गाड्या... आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, माझ्या मधूने प्रेमाने लावलेले हे उंच गुलमोहराचे झाड!

या झाडाकडे मी जेव्हा जेव्हा बघतो ना, तेव्हा मला वाटतं की मधूने जणू माझ्यावर कायमची नजर ठेवली आहे. तीच माझ्यासाठी एकटी उभी आहे. झाडावरची घरटी, चिमुकली पिल्लं... हे सगळं बघत राहून माझा दिवस कसा संपतो, हे मला कळतच नाही. हाच माझा शेवटचा मोर्चा आहे.

काय होतंय मला? शरीर अचानक हिमखंडासारखं थंड पडलंय. अंगातली सगळी ताकद, आयुष्याची सगळी इच्छाशक्ती एका क्षणात नाहीशी झाली. खिडकीतली दृश्ये अचानक धूसर झाली. गुलमोहराचे लाल रंग काळे पडू लागले.

मेजर साहेब: "दामू! दामू! काहीतरी होतंय मला... माझा श्वास!... दामू..."

त्यांना एकदम चक्कर आली आणि त्यांचा वर्तमान संपला.

..

शोभा: "बाबा बोलवत आहेत का?"

अशोक: "अरे हो! आवाज तर बाबांचा वाटतोय. चल पटकन जाऊन बघूया."

ते दोघे धावत आत आले.

अशोक: "बाबा! बाबा! तुम्ही जागे झालात! हळूहळू उठा. मी डॉक्टरांना घेऊन येतो."

मेजर साहेब: "का रे, काय झालं मला? मी झोपलो होतो, नाही का?" त्यांचा आवाज क्षीण आणि कोरडा होता.

दामू (आनंदाने थरथरत): "मेजर साहेब! तुम्ही बरे झालात! देवाचे उपकार! साहेब काय सांगू? अहो, दोन वर्ष! दोन वर्षे तुम्ही झोपून होता. आम्हांला वाटलं, आता काही आशा नाही... पण आज देवाने आमचं ऐकलं. चला, मला धरा आणि हळूहळू उठा बघू."

मेजर साहेब (धक्क्याने): "काय म्हणालास? दोन वर्ष मी फक्त एक ओझं बनून पडलो होतो?"

मेजर साहेब (खोलीकडे अपरिचित नजरेने पाहत): "दामू, ही खोली... माझीच आहे?"

दामू: "होय की साहेब! तुमचीच तर आहे खोली."

मेजर साहेब: "पण... पण मला इथे काहीतरी गहाळ झाल्यासारखं, काहीतरी हरवल्यासारखं वाटतंय."

त्यांनी आपल्या नेहमीच्या दिशेने पाहिले. त्यांचा आवाज बंद झाला. श्वास थांबला.

मेजर साहेब: "अरे, ही समोरची खिडकी कुठे गेली? काय केलं या खिडकीचं?"

दामू (अगदी सहजपणे, जणू काही गंभीर गोष्टच नाही): "अहो, ते वहिनींनीचे कोणीतरी वास्तू-सल्लागार आणले होते. ते म्हणाले,

घरामध्ये सकारात्मक ऊर्जा हवी. म्हणून त्यांनी ही खिडकी कायमची बंद करून टाकली. तसाही काय उपयोग होता त्या खिडकीचा?"

हे ऐकून मेजर साहेबांच्या पायाखालची जमीनच नव्हे, तर संपूर्ण जग सरकले. त्यांच्या छातीत एक असह्य कळ उठली.

'काय उपयोग होता या खिडकीचा?'

दामू, तू फक्त भिंत पाहिलीस. ती खिडकी नव्हती, ती होती माझी मधू, माझा विरंगुळा! माझा श्वास! आता मला कोण दिसणार—त्या रस्त्यावरची माणसे, रस्त्यावर वाहणाऱ्या गाड्या... आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, माझं गुलमोहराचं झाड! आता मी माझ्या मधूला कुठे बघणार? कुठे शोधणार?

मेजर साहेबांनी डोळे मिटले. त्यांना गुलमोहराचा सुगंध हवा होता, चिमण्यांचा किलबिलाट हवा होता, पण त्यांना जाणवली ती फक्त त्या थंड, पांढऱ्या, निर्जीव भिंतीची क्रूर शांतता.

एका बंद खिडकीने त्यांच्या मनातल्या आशेच्या सगळ्या खिडक्या कायमच्या बंद करून टाकल्या होत्या.

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात.

पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे.

माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.